# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे


| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००५ |
| वर्ष | : | सहावे |
| अंक | : | १२ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या**
**"ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ९९**

MAHMAR 19356/13/1/2004-TC



विद्या प्रसारक मंडळ

व्ही. पी. एम.

# दिशा

वर्ष साठावे / अंक १२ / नोव्हेंबर २००५

## संपादकीय

### संयुक्त राष्ट्र संघटनेची ६० वर्षे

१० जानेवारी १९२० ला लीग ऑफ नेशन्सची स्थापना झाली. शांतता व सुरक्षितता यांचे रक्षण करण्यासाठी स्थापन झालेल्या या राष्ट्रसंघाला आपले उद्दिष्ट साध्य करण्यात अपयश येऊन दुसरे महायुद्ध झाले. या दुसऱ्या महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय स्तरावर शांतता नांदावी यासाठी अधिक प्रभावी संघटना अस्तित्वात येण्याची गरज निर्माण झाली आणि अमेरिकेचे अध्यक्ष फ्रँकलिन डेलॅनो रुझवेल्ट यांच्या संकल्पनेतून संयुक्त राष्ट्र संघटनेच्या प्रयत्नांना सुरुवात झाली. २४ ऑक्टोबर १९४५ या दिवशी या संयुक्त राष्ट्र संघटनेची अधिकृत स्थापना जाहीर केली गेली.

हा इतिहास गेल्या २४ ऑक्टोबरला ६० वर्षांचा झाला. ५० राष्ट्रांच्या सदस्यत्वाने चालू झालेल्या या संघटनेचे आज १९१ राष्ट्रे सदस्य आहेत. १९३ राष्ट्रांपैकी तैवान व व्हॅटिकन सिटी संयुक्त राष्ट्र वगळता असणारी ही सदस्य संख्या अनेक दृष्टींनी महत्त्वाची आहे. लोकशाही, अध्यक्षीय पद्धत इ. राज्यपद्धती, ख्रिस्ती, मुस्लिम, बौद्ध, हिंदु इ. धर्म आणि अनेक भाषा ज्या राष्ट्रांची स्वतंत्र ओळख आहेत ती राष्ट्रे गेली ६० वर्षे या संयुक्त राष्ट्र संघटनेचे सदस्य' म्हणून 'निळ्या रंगाच्या पार्श्वभूमीवर पांढऱ्या रंगाच्या ऑलिव्ह वृक्षांच्या शाखांमध्ये असलेला पृथ्वीचा गोल' असलेल्या झेंड्याखाली एकत्र येतात हे आश्चर्य आहे ! संघटनेची महत्त्वाची उद्दिष्टे आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षिततेचे रक्षण, मैत्रीसंबंधांची निर्मिती, मूलभूत मानवी हक्क व स्वातंत्र्याची जोपासना ही आहेत. संघटनेचे आंतरराष्ट्रीय न्यायालय आहे व न्या. बी. एन्. राव, न्या. नागेंद्रसिंग आणि न्या. आर्. एस्. पाठक या न्यायमूर्तींनी आंतरराष्ट्रीय न्यायालयात न्यायाधीश म्हणून काम पाहिले आहे. संघटनेच्या अधिकृत मानण्यात आलेल्या ६ भाषात हिंदीचा समावेश नसला तरी आमसभेत परराष्ट्र मंत्री म्हणून श्री. अटलबिहारी वाजपेयी यांनी हिंदीतून भाषण केले होते हे विशेष !

संयुक्त राष्ट्र संघटनेचे उद्देश इतके स्पष्ट असून, त्यांच्या परिपूर्तीसाठी आपल्या विविध संलग्नित शाखांमार्फत, कार्यक्रमांमार्फत संघटना प्रयत्न करीत असूनही दहशतवादाचे प्रमाण वाढत आहे. २६ जून १९४५ ला संघटनेची सनद मान्य झाली. त्याला ६० वर्षे झाल्याबद्दल संघटनेचे विद्यमान सेक्रेटरी जनरल कोफी अन्नान यांनी जे भाषण केले ते लक्षात घेण्यासारखे आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर निकराचे प्रयत्न चालू असताना देखील दहशतवाद वाढत जावा याबद्दलची चिंता त्यातून व्यक्त होते. या विरोधाभासाचा प्रत्येकानेच विचार करायला हवा.

१९ संलग्न संस्थांमार्फत विविध प्रकारचे कार्य संयुक्त राष्ट्र परिषद जगभर करीत आहे. युनेस्को, इ.एफ्.ए.ओ., विपो. इ. संस्थांचे कार्य भारतात ही अनेकांना माहीत आहे. जग हेच एक खेडे असे मानले तर जगाचा नागरिक ही संकल्पना मनात विस्तारेल. तशी विस्तारली तर आपापसातील भिंती कमी होतील, ज्ञानेश्वर महाराजासारख्या संतांनी तरी काय वेगळे सांगितले होते ? विश्व धर्माचा प्रसार व्हावा आणि मानवीय प्रगतीच्या दिशा स्पष्ट व्हाव्यात हीच अपेक्षा संतांनीही केली होती. त्यासाठी माणसाने जागे होणे मात्र गरजेचे आहे.




वर्ष सहावे / अंक १२ / नोव्हेंबर २००५

संपादक
डॉ. विजय बेडेकर

कार्यकारी संपादक
प्रा. मोहन पाठ

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १० वे / अंक ५वा)

कार्यालय
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०
www.vpmthane.org

मुद्रण स्थळ :
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२९१
२५४१ ३५४६
Email : perfectprints@vsnl.net

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | वास्तवतेचे भान ठेवा | प्रा. स. वा. गोखले | ३ |
| २) | लोकगीतांमधील माहेरचे दर्शन | सौ. सुमेधा बेडेकर | १० |
| ३) | ठाण्यात प्रभात चित्र मंडळ | सुधीर नांदगावकर | १६ |
| ४) | वैदिक ऋषींचे संपत्ती विषयक मनोज्ञ विचार | शं. वा. मठ | १८ |
| ५) | "२१व्या शतकातील सार्वजनिक गंथालये" | सौ. निशा सरदेसाई | २५ |
| ६) | तंत्रनिकेतनात झालेली महत्त्व पूर्ण विषयावरील राष्ट्रीय परिषद | वृत्तांत लेखन- प्रा. मोहन पाठक | २८ |
| ६) | परिसर वार्ता | संकलित | ३३ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# वास्तवतेचे भान ठेवा

*शिक्षण क्षेत्रातील अनेक प्रश्नांचा परामर्श या लेखात प्राचार्य गोखले यांनी घेतला आहे. शैक्षणिक संस्था, त्यांचे कार्य, त्यांच्यासमोरील अडचणी या बद्दलचे वास्तव निरिक्षण या लेखात आहे. - संपादक*

## उपोद्घात

अलिकडच्या काळात शिक्षणसंस्था आणि त्यांचे संचालक यांना टीकेचे लक्ष्य करून ही माणसे समाजविघातक आणि विद्यार्थी विरोधक कशी आहेत हे दाखविण्याची अहमहमिका लागलेही दिसते. ह्या मोहिमेत प्रसारमाध्यमे आघाडीवर आहेत आणि राजकारणी, स्वयंघोषित समाजसेवक, समाज कल्याणाचा आव आणणाऱ्या काही संस्था, शासकीय यंत्रणा इत्यादी अनेक घटक त्यांना रसद पुरवताना आढळून येतात. ह्या प्रचारावर विश्वास ठेवला तर, संस्था चालक हेच खरे आणि एकमेव खलनायक असून समाजाच्या आणि विशेषतः युवा पिढीच्या अधःपतनाला केवळ तेच जबाबदार आहेत असा कोणाचाही ग्रह होणे शक्य आहे. दुर्दैवाने समाजातील जबाबदार घटकांकडून, एवढेच नव्हे तर शिक्षण संस्थांकडूनही त्यांची बाजू मांडण्याचा व टीकेला उत्तर देण्याचा लक्षणीय प्रयत्न झाल्याचे आढळून येत नाही. शिक्षणक्षेत्रातील माझ्या चार दशकांच्या अनुभवावरून माझे असे ठाम मत झाले आहे की काही अपवाद वगळता बहुतेक शिक्षणसंस्था ह्या विद्यार्थ्यांचे व पर्यायाने समाजाचे हित करण्याच्या उद्देशाने प्रेरित असून त्यासाठी प्रयत्नशील असतात. असे असताना संस्थाचालकांना 'माफिया' च्या पंक्तीत बसवणं हे अन्यायकारक आहे. शिक्षण संस्था निर्माण करून त्याचा विकास करणे हे मोठे आव्हान असते. शासकीय यंत्रणा, सरकारी धोरणे, न्यायालयीन निर्बंध, विद्यार्थी, शिक्षक, पालक, सामाजिक संस्था, इत्यादी घटकांमध्ये समन्वय साधून शैक्षणिक विकास घडवून आणणे ही तारेवरची कसरत असते. ह्या सत्याकडे बऱ्याचवेळा दुर्लक्ष केले जाते. हा लेख संस्थाचालकांची भलावण करणे अथवा अपप्रवृत्तींना पाठबळ देणे ह्यासाठी नसून एकूणच सर्व गोष्टींचा वास्तववादी दृष्टिकोनातून विचार करून समस्यांकडे सर्व संबंधितांनी पहावे या उद्देशाने प्रेरित होऊन लिहिला आहे.

संस्थाचालकांपुढील विविध समस्यांचा मागोवा घेऊन त्या द्वारे संबंधित घटकांचे लक्ष वेधून त्यांचा स्थलकाल व्यक्ती निरपेक्ष विचार करण्याचे हे आवाहन आहे. सत्य परिस्थितीचे ज्ञान होऊन केवळ अपप्रचाराचे बळी न होता या समस्यांचे निराकरण समाज हिताच्या दृष्टीने कसे करता येईल हे पाहणे ही विद्यार्थी, पालक, शिक्षक, संस्थाचालक, शासन, सामाजिक संस्था, विद्यार्थी संघटना, शिक्षक आणि प्राचार्य संघटना, शिक्षण तज्ञ इत्यादी सर्व संबंधितांची जबाबदारी आहे. प्रत्येकाने दुसऱ्यावर आरोप करणे हे राजकीय दृष्ट्या सोयिस्कर असले तरी शैक्षणिक विकासाच्या दृष्टीने मारक आहे हे भान सर्वांनी ठेवणे आवश्यक आहे.

## प्रमुख समस्या

संस्थाचालकांना भेडसावणाऱ्या समस्या इतक्या विविधअंगी आहेत की त्या सर्वांची तपशीलवार चर्चा हा एखाद दुसरा लेख मर्यादेचा विषय नसून तो प्रबंधाचाच विषय आहे. तथापि त्यातल्या प्रमुख समस्यांचा थोडक्यात

आढावा घेऊन त्या संदर्भात जनजागृती होऊन साधक बाधक चर्चा होऊन विद्यार्थी आणि समाज हिताच्या दृष्टीने काही ठोस निष्कर्ष निघणे आवश्यक आहे. ह्या दृष्टीने खालील समस्यांचा प्राधान्याने विचार व्हावयास हवा

१) वित्तविषयक

२) मनुष्यबळ

३) भूखंड इमारती इत्यादी

४) प्रशासकीय

५) अभ्यासक्रम विषयक

या सर्व बाबी परस्परावलंबी असल्याने त्यांची चर्चा करताना पुनरावृत्ती होण्याची शक्यता आहे. विविध समस्या या दुसऱ्या समस्यांचे कारण व परिणाम दोन्ही असू शकतात. उदाहरणार्थ प्रशासकीय समस्या ह्या मनुष्यबळ विषयक तसेच वित्तविषयक समस्यांचे कारण व परिणाम दोन्ही असतात. वर उल्लेखिलेल्या समस्यांचा आढावा पुढील प्रमाणे घेता येईल.

**वित्तविषयक :**

वित्त हा कोणत्याही व्यवसायाचा पाया आहे. अर्थातच पाया मजबूत असल्याशिवाय कोणतीही इमारत बांधणं शक्य नाही.

शिक्षणसंस्थांच्या उत्पन्नाचे स्रोत व खर्चाच्या बाबी स्थूलमानाने पुढीलप्रमाणे मांडता येतात.

| उत्पन्नाचे मार्ग | खर्चाच्या बाबी |
|---|---|
| शुल्क | वेतन |
| अनुदान | वेतनेत्तर खर्च |
| देणग्या | भांडवली खर्च |

ह्यापैकी अनुदानित (Aided) शैक्षणिक संस्थांना मान्य वेतनाच्या १०० टक्के अनुदान प्राप्त होते. मान्य वेतन (Admissable Salary) म्हणजे ज्या जागांना विद्यापीठाची मान्यता मिळाली असेल (Approval) त्या जागांचे वेतन होय.

काही तांत्रिक वा इतर अडचणींमुळे काही जागांना मान्यता मिळाली नसेल तर त्या जागांच्या वेतनाचे अनुदान मिळत नाही. मान्यता मिळण्यातील प्रमुख अडचणी म्हणजे शासनाकडून प्राप्त होणारे 'ना हरकत प्रमाणपत्र' (NOC) काही जागांचे असे प्रमाणपत्र न मिळाल्यास त्या वेतनांचे अनुदान प्राप्त होत नाही व त्याचा पूर्ण बोजा संस्थेवर पडतो. ही समस्या गेल्या काही वर्षात तीव्रतेने भेडसावत आहे. बिनराखीव जागांना ना हरकत प्रमाणपत्र दिलेच जात नाही तसेच राखीव जागांवर विशिष्ट प्रवर्गाचा उमेदवार न मिळाल्यास इतर उमेदवारांना विद्यापीठाची मान्यता न मिळाल्याने त्यांच्या वेतनावरील खर्च अग्राह्य ठरतो व त्याचा भार संस्थेला सोसावा लागतो. कित्येक संस्थांच्या एकूण वेतनखर्चाच्या 30 ते 40 टक्के खर्चाचा भार संस्थेवर पडतो. वेतनेतर अनुदान हे ग्राह्य वेतनखर्चाच्या 12 ते 16 टक्के असते पण गेल्या पाच ते सहा वर्षात कोणत्याही महाविद्यालयाला वेतनेतर अनुदान प्राप्त झालेले नाही. फी वाढीमुळे काही प्रमाणात वेतनेतर खर्च भागवता येत असल्याने संस्थेवरचा तेवढा भार गेल्या दोन ते तीन वर्षात हलका झाला असला तरी अजूनही संस्थांना एकूण खर्चाचा मोठा बोजा सहन करावा लागतो.

विनाअनुदानित अभ्यासक्रमांच्या शुल्क रचने बाबत अंतिम मान्यता प्रलंबित असल्याने सध्या विद्यापीठाने सुचवलेल्या दराने शुल्क वसूली केली जाते. पण हे शुल्क वेतन आणि वेतनेतर बाबींवरील नित्य खर्चाची जेमतेम तोंड मिळवणी करू शकते. पण नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी भूखंड, इमारती, प्रयोगशाळा, फर्निचर, वीज, टेलिफोन इत्यादी बाबींवर कराव्या लागणाऱ्या भांडवली स्वरुपाच्या अफाट खर्चाची कोणतीही तरतूद

नाही. ज्या संस्थेला असे अभ्यासक्रम चालू करावयाचे असतील त्यांना ह्या खर्चाची तरतूद करावी लागते. उद्योगधंद्याशी संबंधित काही थोड्या संस्थांचा अपवाद वगळल्यास बहुतेक शिक्षण संस्थांना ही गोष्ट कठीण जाते. शिक्षण संस्था ह्या धर्मादाय संस्था असल्याने त्यांना व्यक्ती, संस्था आणि समाज यांच्या कडून मिळणाऱ्या देणग्या हा निधी उभारण्याचा एकमेव मार्ग शिल्लक रहातो. अशा परिस्थितीतील शिक्षणसंस्थांनी आजी माजी विद्यार्थी, पालक, दानशूर व्यक्ती इत्यादीं कडून ऐच्छिक आर्थिक सहाय्याची विनंती केली तर संस्था चालक हे खंडणी बहाद्दर अथवा 'माफीया' कसे ठरतात हा समाजाने गंभीरपणे व साकल्याने विचार करण्याचा विषय आहे. अर्थात देणग्या ही प्रवेशाची अट असू नये आणि असा निधी देण्याची आर्थिक क्षमता नसणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित ठेवले जाऊ नये ह्या बाबत दुमत असूच शकत नाही. अशा स्वरुपाचे गुन्हे करणाऱ्या संस्थाविरूद्ध योग्य ती कारवाई करणे आवश्यक आहे. पण सब घोडे बारा टक्के असा न्याय लावून साप साप म्हणून भूमी बडवत बसण्याने समाजाचे हित तर साधणार नाहीच पण अशा सेवाभावी शिक्षण संस्था नाईलाजाने बंद करण्याची वेळ निधीअभावी आल्यास युवा पिढीच्या भविष्याच्या दृष्टीने व समाजविकासाच्या दृष्टीने ते हानिकारक ठरेल ह्याची नोंद सर्वांनी घेणे आवश्यक आहे. योग्य त्या सक्षम यंत्रणे द्वारे संस्थांच्या आर्थिक व्यवहारांची वार्षिक तपासणी काटेकोरपणे झाल्यास अपप्रवृत्तींना आळा घालणे अशक्य नाही.

**मनुष्यबळ** - कोणतीही संस्था कार्यक्षम होण्यासाठी शिक्षित, प्रशिक्षित, सेवाभावी, कार्यतत्पर आणि समर्पित मनुष्यबळाची नितांत आवश्यकता असते. शिक्षण क्षेत्रात याव्यतिरिक्त विद्यार्थी हिताची भावना, विषयाचे व त्या संबंधी आधुनिक माहितीचे सखोल ज्ञान, नियमितपणा, इत्यादी अनेक गुणांची जरूरी असते. अशा व्यक्ती उपलब्ध झाल्या तर संस्थेची प्रगती होऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला जाऊ शकतो. असे मनुष्यबळ प्राप्त करणे सध्याच्या परिस्थितीत दिवसेंदिवस कठीण होत आहे.

या वर्षीच्या शिक्षक दिनाच्या समारंभात मा. मुख्यमंत्री विलासराव देशमुख असं म्हणाले की ''गुणवत्तावान विद्यार्थी डॉक्टर, इंजिनियर, आर्कीटेक्ट, संगणकतज्ञ इत्यादी होण्याची ध्येयं बाळगतात, पण त्यांच्यांपैकी कोणीही मी शिक्षक अथवा प्राध्यापक होईन असं म्हणताना आढळत नाही.'' 'असं का व्हावं' ह्याचा शिक्षकांनी विचार करावा असंही मा. मुख्यमंत्र्यांनी सुचवलं. त्यांनी मांडलेले विचार अगदी समर्पक होते यात शंकाच नाही. गुणवत्तावान शिक्षक प्राप्त झाल्याशिवाय शिक्षणाचा स्तर उंचावणारच नाही. हे त्रिकालाबाधित सत्य आहे. असं का होतं याचा केवळ शिक्षकांनीच नव्हे तर पालक, विद्यार्थी, शासन, शिक्षक ह्या सर्वांनीच विचार करावयास हवा. कोणत्याही व्यवसायात अथवा नोकरीत प्रवेश करताना व्यक्ती त्या व्यवसायातील स्थैर्य, वेतन, भविष्यकालीन प्रगतीची संधी इत्यादी गोष्टींचा विचार करूनच निर्णय घेत असते. ह्या दृष्टीने पाहिल्यास शिक्षकांची परिस्थीती निश्चितच अनुकंपनीय आहे. विशिष्ट शैक्षणिक पात्रतेवर इतर व्यवसायात शिक्षकी पेशाच्या तुलनेत स्थैर्य, वेतन आणि भविष्यकालीन प्रगती या सर्वच बाबतीत परिस्थिती उत्तम असल्याने गुणवत्तावान उमेदवारांचा ओढा तिकडे असणे स्वाभाविक आहे. त्यांना शिक्षकी पेशात आकृष्ट करायचं असेल तर भोवतालच्या परिस्थितीत आमूलाग्र बदल होणं आवश्यक आहे. सध्या शिक्षक आणि प्राध्यापकांची भरती ही अत्यंत चिंतेची समस्या आहे. अलीकडील काळात कंत्राटी नेमणूक आणि तासिकेनुसार नेमणूक ह्या दोन पध्दतीमुळे विद्यार्थ्यांचे अतिशय नुकसान होत आहे.

त्यापैकी कंत्राटीपध्दतीवरील शिक्षकांची भरती करण्यासाठी फक्त राखीव जागांवरील उमेदवारांचा विचार केला जातो. मागासवर्गीय जाती जमातींपैकी न्यूनगुणवत्ताधारक उदा. नेट अथवा सेट न झालेल्या उमेदवारांची कंत्राटी पद्धतीने भरती केली जाते. उच्च महाविद्यालयीन कंत्राटी व्याख्यात्याला रू. 8000/- तर कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षण सेवकाला रू. 5000/- दरमहा वेतन दिले जाते. सर्वसाधारणपणे हे वेतन नियमित वेतनाच्या पन्नास टक्के असते तसेच त्यांना महागाई भत्यात वेळोवेळी होणारी वाढ प्राप्त होत नाही.

नियमित स्वरुपातील वेतनश्रेणीवरचे व्याख्याते आणि कंत्राटी पद्धतीवर नेमलेले व्याख्याते याव्यतिरिक्त तासिका वेतनावर(CHB) नेमले गेलेले व्याख्याते हा एक वेगळाच वर्ग आहे. यांची परिस्थिती सर्वात दयनीय आहे. दैनिक वेतनावर ह्यांची नेमणूक केली जाते तासिकेला 75 रु. (उच्च महाविद्यालय) व 20 रु. (कनिष्ठ महाविद्यालय) अशा दराने यांना प्रत्यक्ष घेतलेल्या तासिकांचे वेतन दिले जाते. एकाच व्याख्यात्याला पूर्ण कार्यभार (20 तासिका) असल्यास ह्या शिक्षकांना दरमहा (20x75x4) = 6000 रू. अंदाजे मिळतात. अर्थात सुट्टी असली तर त्या दिवसाचा रोजगार बुडतो. ना हरकत प्रमाणपत्र विद्यापीठीय मान्यता नसल्यामुळे कित्येक संपूर्ण गुणवत्ताधारक शिक्षकांची अशी परवड होत आहे. याकडे गंभीरपणे पाहण्याची गरज आहे.

पाचव्या वेतन आयोगाची अंमलबजावणी झाल्यानंतर शिक्षण क्षेत्रातल्या व्यक्तींचे राहणीमान निश्चितपणे उंचावले आहे, मात्र त्या प्रमाणात शिक्षकांचा शैक्षणिक उपक्रमातील ऐच्छिक सहभाग वाढलेला दिसत नाही ही गोष्टही येथे नमूद करावयास हवी. विद्यापीठ अनुदान आयोगाने व संबंधित राज्य सरकारने तासिका वाढ, महाविद्यालयात किती तास थांबावे यात केलेली वाढ, शिक्षकांचा शिक्षणेतर उपक्रमातील अनिवार्य सहभाग इत्यादी बंधने लादली असली तरी त्यातूनही पळवाटा शोधणारे व काम टाळणारे महाभाग इतर क्षेत्रांप्रमाणे शैक्षणिक क्षेत्रातही आहे. तब्येत बरी नाही म्हणून महाविद्यालयातून वैद्यकीय रजा घेणारे त्या काळात शिकवणी वर्गात मात्र हजर असतात अशी ही उदाहरणे सापडतात. खाजगी शिकवण्या आणि खाजगी शिक्षणवर्गातील काम ह्याच्यावर कायदेशीर बंधने असली तरी त्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी केली जात नाही हे सत्य दुर्लक्षित करून चालणार नाही.

सारांश, मनुष्यबळ नियोजनाच्या बाबतीत शिक्षण क्षेत्राची अक्षम्य हेळसांड चालू आहे. पाचव्या वेतन आयोगामुळे काही व्यक्तींना भरपूर आर्थिक सुबत्ता प्राप्त झाली असली तरी या व्यवसायात नव्याने प्रवेश करू इच्छिणाऱ्या गुणवत्ता धारक उमेदवारांचा मार्ग मात्र काट्याकुट्यांनी भरलेला आहे. अशा परिस्थितीत शिक्षित आणि प्रशिक्षित उमेदवार अगदीच अपरिहार्य असल्याशिवाय या क्षेत्रात प्रवेश करणार नाही आणि प्रवेश केला तरी त्यात टिकून राहणार नाही.

खाजगी शिक्षणसंस्थांना आर्थिक आणि प्रशासकीय स्वायत्तता प्रदान केली तर काही वर्षात या परिस्थितीत चांगल्या दिशेने सुधारणा होऊन विद्यार्थ्यांची परवड थांबू शकेल. संस्थाचालकांना अधिक स्वातंत्र्य देण्यास विरोध करणाऱ्या लोकांना कडक शिस्तीची भिती वाटत असते.

मनुष्य बळाच्या समस्या सोडविण्यासाठी शासन, संस्थाचालक, शिक्षक या सर्वच घटकांची मानसिकता बदलण्याची गरज आहे.

**भूखंड इमारती वगैरे**

कोणत्याही संस्थेला आपली उद्दिष्टे राबवण्यासाठी भूखंड आणि विविध इमारती ह्यांची तरतूद

करावी लागते. उद्योगधंदे हे नफाप्रेरित असल्याने ह्यासाठी आवश्यक ती प्रचंड गुंतवणूक भविष्यावर नजर ठेवून करणे हे त्यांना सहज शक्य होते. शिक्षण संस्थांच्या बाबतीत मात्र भूसंपादन आणि इमारती बांधणे ही मोठी समस्या असते. यापैकी काही भूखंड शासन अथवा स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत प्राप्त होऊ शकतो पण सर्वसाधारणपणे असे राखीव भूखंड अविकसित असतात. शिक्षण संस्थांना त्यांच्या विकासासाठी प्रचंड प्रमाणात खर्च करावा लागतो. ह्या नंतरचा टप्पा म्हणजे प्रत्यक्ष इमारती बांधणे व त्या शैक्षणिक गरजांप्रमाणे व काही अंगभूत अटींप्रमाणे सुसज्ज कराव्या लागतात. यात क्लासरूम, वाचनालय, जिमखाना, ऑफिस, स्टाफ रूम, लेडीज रूम, बॉईज रूम, कँटीन, सभागृह इत्यादी विविध बाबींचा समावेश होतो. या शिवाय त्यामध्ये फर्निचर, दृकश्राव्य यंत्रणा, वीज, फोन इत्यादी पायाभूत सुविधा पुरवाव्या लागतात. ह्या सर्वांसाठी जो कोट्यावधी रूपयांचा खर्च करावा लागतो त्याची बहुतांश तरतूद संस्थेलाच करावी लागते. कारण यासाठी शासन, विद्यापीठ अनुदान आयोग इत्यादी कडून मिळणारी मदत अत्यंत तुटपुंजी असते. या सर्व सोयी दीर्घकालीन समाज कल्याणासाठी असल्याने त्यासाठी समाजाकडून मदत, देणग्या इत्यादी स्वरूपात मागणी केल्यास संस्थाचालकांना खंडणी बहाद्दर ठरवणे हे अन्यायाचे आहे. या सर्व सामान्य समस्यां व्यतिरिक्त विशिष्ट संस्थेला भेडसावणारे अनेक प्रश्न असतात. उदा. संस्थेला शासनाकडून प्राप्त झालेल्या भूखंडावर शहर विकास आराखड्यात काही आरक्षणे लावली जातात. ज्यांचा शैक्षणिक कार्याशी काही संबंध नसतो अशी आरक्षणे उठवून तो संपूर्ण भूखंड शैक्षणिक संस्थांना शैक्षणिक कार्यासाठी विनाविलंब उपलब्ध करून देणे, हे संबंधित खात्यांचे कर्तव्य आहे. पण ही प्रकिया देखील लाल फितीत अडवून विद्यार्थ्यांचे भरून न निघणारे नुकसान होऊ देणे हा सामाजिक गुन्हा आहे. पुरेशी जागा व अपुऱ्या इमारती ह्यात समस्येमुळे कित्येक संस्थांना विद्यार्थ्यांच्या भविष्याच्या दृष्टीने आवश्यक असणारे अभ्यासक्रम सुरू करता येत नाहीत. यात समाजाची मोठी हानी आहे. याची नोंद सर्व संबंधितांनी घेणे आवश्यक आहे.

### प्रशासकीय

नवीन आर्थिक धोरण LPG (Liberalization, Privatization, Globalization) खऱ्या अर्थाने शिक्षण क्षेत्रात लागू होणे ही बदलत्या काळाची गरज आहे. उद्योगधंद्याच्या विकासासाठी ही त्रिसूत्री परिणामकारक ठरत असेल तर ती शिक्षण क्षेत्रातही क्रांती घडवून आणू शकेल. इतर बाबतीत उदारीकरण आणि खाजगीकरणाचा आग्रह धरताना शिक्षण क्षेत्रावर विविध बंधने लादून त्याचे सरकारीकरण चालूच ठेवणे हे योग्य पाऊल नाही. या क्षेत्रात परकीय शिक्षण संस्थांना प्रवेश मान्य करून देशातील संस्थाना शासकीय बंधनात ठेवल्यास त्या स्पर्धेच्या दृष्टीने कमकुवत होतील. त्या संस्थांना स्वावलंबी बनायचं असेल तर त्यांना व्यापक स्वातंत्र्य देणं यात शिक्षण क्षेत्राचे हित आहे. सध्या वेतन, शुल्क, नेमणूका, अभ्यासक्रम, प्रवेश या सर्वच प्रशासकीय बाबतीत शासकीय आदेशाने काम करावे लागते. खरं तर **या बाबतीत शिक्षण संस्थाना स्वातंत्र्य देणं ही बदलत्या काळाची गरज आहे.** या बाबतीत सर्व संबंधितांच्या सहकार्याने (संस्थाचालक, शिक्षणतज्ञ, शासन, पालक इत्यादी) एक व्यापक धोरणात्मक चौकट निश्चित करून त्या चौकटीत वेतन निश्चिती, शुल्करचना, नेमणूका, प्रवेश, अभ्यासक्रम इत्यादी बाबतीत शिक्षण संस्थांना स्वायत्तता देऊन उदारीकरणाचा प्रत्यक्ष अवलंब केला गेल्यास शैक्षणिक क्षेत्रातील मरगळ, निरुत्साहीपणा इत्यादी त्रुटी दूर करता येतील. सक्षम व्यवस्थापनामुळे शिक्षण क्षेत्रात व्यावसायिकता निर्माण होऊन विद्यार्थी, शिक्षक आणि एकूणच समाज यांचे दीर्घकालीन हित साधता येईल.

व्यक्तिमत्त्व विकास हे शिक्षणाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी तात्काळ निर्णय, कठोर परिश्रम, कार्यक्षमतेनुसार मोबदला, बांधिलकी, Accountability, व्यापक संधी, गुणवत्ता आधारित मनुष्यबळ विकास इत्यादी गोष्टींची आवश्यकता असते. खाजगी प्रशासनाच्या मार्फत एखाद्या बहुराष्ट्रीय उद्योगसमूहा सारखी शिस्त शिक्षणाशी संबंधित सर्वच घटकांमध्ये निर्माण होईल.

मनुष्यबळाच्या बाबतीत शिक्षणसंस्थांच्या प्रशासनाला भेडसावणारी गंभीर समस्या म्हणजे गुणवत्ताधारक व्यक्तींची अनुपलब्धता. याचा राखीव जागाविषयक धोरणाच्या अंमलबजावणीशी निकटचा संबंध आहे. राखीव जागा विषयक धोरण ही घटनात्मक तरतूद असल्याने व त्याची राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने आवश्यकता असल्याने त्याला विरोध असण्याचे काही कारण नाही. प्रश्न आहे तो त्याच्या अंमलबजावणीचा ह्याबाबतीत शासनाने व्यवहारिक दृष्टिकोन स्वीकारणे आवश्यक आहे. बऱ्याच शाळा व महाविद्यालयांमध्ये विशिष्ट प्रवर्गाचे, विशेषतः अनुसुचित जमाती (ST) उमेदवार वर्षानुवर्ष मिळत नाहीत. अशावेळी उपलब्ध प्रवर्गातील उमेदवाराची नेमणूक करणे जरूरीचे होते. अशा उमेदवारांना पूर्वी एका शैक्षणिक वर्गासाठी मान्यता मिळत असे. सध्या अशा मान्यते अभावी त्यांची नेमणूक तासिका तत्त्वावर (CHB) करावी लागते. एकतर त्यांचे वेतन शासनाकडून मिळत नाही न दुसरे म्हणजे असे शिक्षक वर्षभर टिकून रहात नाहीत. परिणामी विद्यार्थ्यांचे नुकसान होते. ह्या शिवाय बहुसंख्यांक आणि अल्पसंख्यांक संस्था अशी विभागणी अस्तित्वात आहे. हयापैकी अल्पसंख्याक महाविद्यालयांना, ती अनुदानित असूनही, राखीव जागांचे बंधन नाही परिणामी मुक्त प्रवर्गातील उमेदवार अशा महाविद्यालयांना पसंती देतात. सर्वसाधारणपणे महाराष्ट्रीयांच्या व्यतिरिक्त इतर व्यवस्थापनांना अल्पसंख्याकांचा दर्जा दिला जातो. त्यामुळे महाराष्ट्रीयन संचालित शिक्षण संस्थांची उमेदवार नेमणुकीबाबत परवड होते. शैक्षणिक हिताच्या दृष्टीने त्यासंबंधी व्यावहारिक दृष्टिकोन स्वीकारणे अत्यावश्यक आहे.

## अभ्यासक्रम

अभ्यासक्रम असा असावा की ज्यातून विद्यार्थ्यांचे भवितव्य घडेल व समाजाची अथवा उद्योगधंद्याची गरज भागेल (Career oriented & need based). यासाठी स्थलकाल परिस्थिती सापेक्ष अशा अभ्यासक्रमांची गरज आहे. नोकरीच्या संधी अथवा व्यावसायिक प्रावीण्य प्राप्त करुन देणारे अभ्यासक्रम निर्माण करुन त्याबद्दल जनजागृती होणे महत्त्वाचे आहे. मुंबई विद्यापीठाने अलिकडील काही वर्षात सुरु केलेल्या BMS, BCOM (Banking & Insurance, Accounts & Finance) BScIT, BMM इत्यादी सारखे विविध अभ्यासक्रम निर्माण होणे आवश्यक आहे. प्रत्येक विषयाच्या अभ्यासक्रमाची आखणी करताना त्यात अत्याधुनिक ज्ञान प्राप्तीचा अंतर्भाव केला जावा. पारंपरिक **कला, विज्ञान, वाणिज्य हया शाखांमधील विविध विषय व त्यांचे अभ्यासक्रम यात फार मोठे गतिशील बदल करावयास हवे.** शिवाय अभ्यासक्रम चांगले असूनही अंमलबजावणीतील अडचणींमुळे विद्यार्थ्यांना त्रास सहन करावा लागतो. त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे प्रथम वर्षासाठी असलेल्या F.C. (Foundation Course) हा विषय. ह्या अभ्यासक्रमाची रचना विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा हा दृष्टीकोनातून केली गेली होती. त्याची सुयोग्य हाताळणी विद्यार्थी हिताची ठरली असती. प्रत्यक्षात मात्र हा विषय, ज्यांना कार्यभार कमी आहे अशा अनेक शिक्षकांमध्ये वाटला जातो. त्यामुळे ज्या पद्धतीने हा विषय शिकवला जावा अशी अपेक्षा होती ती पूर्ण झाली नाही.

खाजगी शिक्षणसंस्थांना विश्वासात घेऊन त्यांच्यावर नवीन कोर्सेस व अभ्यासक्रम यांची जबाबदारी टाकली तर स्पर्धा निर्माण होऊन युवा पिढीच्या गुणवत्तेला वाव देणारे आणि बाजाराची गरज भागवणारे अभ्यासक्रम सुरु करणे अशक्य नाही.

**उपसंहार**

वरील विवेचनात शिक्षणसंस्था, शैक्षणिक धोरण, नवीन आर्थिक धोरण, इत्यादींशी संबंधित विविध समस्यांना स्पर्श करण्याचा छोटासा प्रयत्न केला आहे. ह्याचा सारांश असा की बदलत्या आर्थिक, सामाजिक आणि शासकीय परिस्थितीत शिक्षणक्षेत्राचा प्राधान्याने विचार व्हावा. सद्यपरिस्थितीत सर्वच बाबतीत शासनावर अवलंबून रहाणे योग्य ठरणार नाही. शंभर कोटीपेक्षा जास्त लोकसंख्येच्या राष्ट्रात शिक्षणाची संपूर्ण आर्थिक जबाबदारी स्विकारणे कोणत्याही सरकारला शक्य होणार नाही ही जबाबदारी आता संपूर्ण समाजाची असणार आहे. अशावेळी खाजगी शिक्षणसंस्थाना व्यापक स्वायत्तता दिल्यास परिस्थितीत योग्य ती सुधारणा घडवून आणता येईल. निकोप स्पर्धा, आधुनिक ज्ञानाची आस, समाजाच्या कुवतीप्रमाणे व उद्योगधंद्याच्या गरजेनुसार शिक्षण आणि त्याद्वारे नवभारताची उभारणी करून पुढील पाव शतकात भारताला खऱ्या अर्थाने महासत्ता बनवणं शक्य होईल त्यासाठी **सर्व संबंधितांच्या मानसिकतेत योग्य तो बदल व्हावयास हवा. संस्थाचालक म्हणजे समाजविघातक खलनायक नसून तेही ह्याच समाजाचे घटक आहेत** व योग्य परिस्थिती निर्माण झाल्यास खाजगी शिक्षणसंस्था समाजकल्याण घडवू शकतील अशा संस्थाना केवळ टीकेचे लक्ष्य न बनवता त्यांच्या कार्याची योग्य ती दखल सर्व संबंधितांनी घ्यावी. सध्या काही संस्थाचालकना 'शिक्षणसम्राट' म्हणून हिणवले जात आहे भारती विद्यापीठ, डी. वाय. पाटील शिक्षणसमूह इत्यादी अनेक शिक्षण संस्थांनी शैक्षणिक विकासात मोलाची भर घातली आहे. खाजगी संस्थांच्या काही चुका अथवा दोष असतील पण केवळ त्यावर लक्ष केंद्रित करून त्यांच्या कार्याकडे दुर्लक्ष करणे अन्यायाचे आहे. काहींना हे विचार एकांगी वाटत असल्यास त्यांनी दुसरी बाजू जरूर मांडावी. खरंतर ह्यावर विचारमंथन, चर्चा, वाद-प्रतिवाद व्हावेत हीच प्रस्तुत लेखाची अपेक्षा आहे. **विघातक टीकेपेक्षा विधायक चर्चेतूनच समस्यांचे योग्य निवारण होऊ शकेल व त्याद्वारे सगळ्यांचेच हित होईल म्हणून वास्तवतेचे भान ठेवा.**

**प्राचार्य स. वा. गोखले**
माजी प्राचार्य,
जोशी बेडेकर कला वाणिज्य महाविद्यालय,
ठाणे.

दिशा
नियमित वाचा

# लोकगीतांमधील माहेरचे दर्शन

*लोकजीवनाचा सार्थ अविष्कार करणारी लोकगीते हे मराठी साहित्याचे वैशिष्ट्य पूर्ण अंग आहे. या लोकगीतांतून व्यक्त होणाऱ्या 'माहेरा' विषयी - संपादक*

लोकसाहित्यात लोकगीतांना प्रमुख स्थान आहे. सभ्य आणि शिष्ट जीवनापासून दूर आणि कमी अधिक रांगड्या अवस्थेत असलेल्या लोकांची जीवनविषयक अभिव्यक्ती म्हणजे लोकगीत होय. शास्त्रीय नियमांची विशेष अशी पर्वा न करता सामान्य लोकव्यवहाराच्या उपयोगासाठी माणसे आपल्या आनंदाच्या उल्हासात ज्या वाणीचा सहज आणि छंदोबध्द आविष्कार करतात, ते लोकगीत समजावे. रचनेची द्रुतगती, भाषेचा साधेपणा, साहित्यिक कृत्रिमतेचा अभाव, देशकालाचे स्थूलचित्रण आणि सार्वजनिक भावना ही लोकगीतांची लक्षणे होत. लोकगीते ही सामान्यपणे समुदायाने गायली जातात. त्यांना एक अंतरिक लय असते, तालबध्दताही असते. नृत्य करीत असताना गायली जातात. गीत, नृत्य व संगीत अशा तीन प्रकारांनी लोकगीतांची अभिव्यक्ती होत असते. लोकगीतांचे विषय अनेक असतात शेती, विवाहादी संस्कार, पुत्रजन्म, ऋतूपरिवर्तन आणि मनोरंजन याप्रसंगी ही गीते गायली जातात. संस्कार, देवतांची उपासना, व्रतवैकल्ये, सणउत्सव या सर्व गोष्टींच्या ठिकाणी मुळाशी धर्म हे प्रधानतत्त्व लक्षांत ठेवून अशा प्रसंगी गायल्या जाणाऱ्या लोकगीतांना मंत्राएवढी प्रतिष्ठा असते. नवरसांपैकी शृंगार, करूण, वीर, हास्य व शांत हे लोकगीतांचे प्रमुख रस होत. जात्यावरच्या ओव्या, भलरी गीते, मुलींची सासरची पाठवणी व माहेरचे मूळ, पती बाहेरगावी गेल्यावर त्याचा जाणवणारा विरह, करूणरस, गंगा, तुलसी, पार्वती यांची गीते आणि कौटुंबिक जीवनातील आत्मसंतोष व्यक्त करणारी गीते ही शांतरसाची उदाहरणे आहेत. बहुतेक लोकगीते समूहाच्या पूर्वांगात गायली जातात. ग्रामगीते या सभ्यतेचे वेद 'श्रुती' आहेत. वेदही आपल्या प्रारंभिक काळांत श्रुती या नावानेच ओळखले जातात. तीही आर्यांच्या महान जातीची गीते होती.

सर्वसामान्य स्त्रीच्या जीवनातील जीवाभावाच्या माणसांनी गजबजलेली सासरमाहेर ही दोन हक्काची अशी प्रमुख ठिकाणें आहेत. परंतु पिढ्यान् पिढ्यांच्या लोकगीतांनी मात्र त्यातले एक आवडते न् एक नावडते ठरविले आहे. जुन्या काळच्या लहान वयांतील सासुरवाशिणीने अनुभवलेला हा भाव आजच्या काळात बदलतोय का? हल्ली मुली सासरी किंवा स्वत:च्या घरी वेगळ्या रहातात, त्यामुळे स्वतंत्रेत त्या आनंदी आहेत कां ? का आता नवीन प्रकारच्या ओव्यांची भर घालावी? असा विचार या प्रश्नाचा विचार करताना येतो. डॉ. सरोजिनी बाबर यांनी लोकगीतांत मोलाची भर घातली आहे. पूर्वीचे सासर-माहेरचे वर्णन त्या काळातील परिस्थितीप्रमाणे असायचे. ''माहेर'' हा स्त्रियांच्या आस्थेचा विषय. सगळ्यांपेक्षा माहेरची अपूर्वाई भारी सरस ठरते. माहेर म्हटले की मग -

रूणुझुणुत्या पाखरा रे, जा माझ्या माहेरा  
कमानी दरवाजा, त्यावरी बैस जा  
घरच्या आईला, सांगावा सांग जा  
दादाला सांग जा रे, ने मला माहेरा  
रुणुझुणुत्या पाखरा रे, जा माझ्या माहेरा

असाहृदयस्पर्शी भाव उफाळून वर येतो. सुखासमाधानाने ओठांवर घुटमळतो. त्यावर मग लगेच

काळजाची शाल पातली जाते. आनंदाने मन वेडे होते. पिढ्यानूपिढ्याच्या स्त्रियांनी सासर-माहेरच्या ओव्या लोकगीतांचे वर्णन उराशी बाळगले आहे. त्या कारणाने नागपंचमीला खेळतांना मोठ्या वयाच्या बायका देखील भारी चवीने असली सासर माहेरची गीते गाताना दिसून येतात. (खेडेगावात अधिक)

माझं माहेर पंढरपूर बाई, पंढरपूर

माझं आजूळ, रत्नागिरी बाई, रत्नागिरी

रत्नागिरीच्या, नाक्यावरी बाई, नाक्यावरी

झेल झुलतो चांफ्यावरी बाई, चाफ्यावरी

नाग डुलतो टेकावरी बाई, टेकावरी

लहानपणी सासरच्या लोकांची माहेरी जाण्याची सासरी माहेरी जाण्याची परवानगी मिळवणे ही एक मिन्नतवारीच असे, ती मिळाली नाही की तक्रार रूपाने लोकगीत तयार होई. (हल्ली सासुरवाशीणींची परिस्थिती वेगळी आहे. शहरात विचारणे नसते, 'ऑर्डर', 'सांगणेच' असते.) पूर्वीचे लोकगीत

घराचा घरधंदा मी करते, पाण्याला एकली जातें.

जिवू बाई करींदरा कामानी, जाते माहेराला- ॥धृ॥

कधी मी सोडिला का घराचा उंबरठा

कधी हा भेटला का बाप माझा गोमटा ॥१॥

कधी मी सोडिली का दारीची साखळी

कधी मी भेटले का आई माझी सोयरी ॥२॥

कधी मी सोडीला का दारीचा पिंपळ

कधी हा भेटला का भाऊ माझा विठ्ठल ॥३॥

कधी मी सोडिली का नदी साखळी

कधी ही भेटली का मैन माझी धाकली ॥४॥

त्यामुळे साहजिकच माहेरची ओढ लागून, माहेरचा भलेपणा मनात भरलेला दिसतो. कौतुकाने भारवला जातो. हौसेमौजेने आळवला जातो. माहेरचे सुख भोगलेल्या सासूबरोबर माहेरी निघालेल्या तिच्या सुनेची बोलणी कानावर येतात.

- कारल्याच आळं लाव ग जूं, मंग जा तूं तुपल्या माहेरा

कारल्याचं आळं लावलं ग फुईजी, बंधु आले न्यायजी

मी जाते आपल्या माहेरा।

- कारल्याल पानं येऊ दे ग जूं, मंग जा तूं तुपल्या माहेरा

कारल्याला पानं आले वो फुईजी, बंधु आले न्यायजी

मी जाते आपल्या माहेरा।

- कारल्याला कारलें येऊ दे ग जूं, मंग जा तूं तुपल्या माहेरा

कारल्याला कारले आली वो फुईजी, बंधु आले न्यायजी

मी जाते आपल्या माहेरा।

- कारल्याची भाजी कर गं जूं
- कारल्याची भाजी केली वो फुईजी
- कारल्याची भाजी खा ग जूं,
- कारल्याची भाजी खाल्ली वो फुईजी

बंधु आले माहेरी न्यायजी, मी जाते आपल्या माहेरा।

होय नाही करत माहेरी जायची परवानगी मिळते. छोटी सासुरवाशीण खूप खूषीत असते, हे सर्व आपल्या पतीदेवामुळे घडले अशी तिची भावना खूप सुखावते व पतीच्या रूपाने सासरमाहेर एकत्र गुंफीत सांगते. नवरा बायकोचे प्रेम हे असे आहे.

खजूर गवळ्याची बानू, बानू खजून बर्री

घालव नंदच्या कानी, सखा उतरील राती

लक्षुमन वळत्याती म्हशी, दुधं भरील वाडा

धुरपाय करत्याती ताक, पदर वाऱ्यानं गेला.

माहेरी जाण्यासाठी मन आसुसलेले असते.

आंबानी कयरी आंबाले झोका खाये, लेक कमयजा भाऊनी वाट पाह्ये

मायेच्या बळावरच संसार आणि जीवन सुसह्य होते.

भाऊ तुना घर बहीनमाशीना रूसवा, दिवायीनी चोयी एक रातना इसावा ।

भाऊ तुना घर बहीन उनी नादारीनी, नको लेऊ साडी चोयी गोद सांग उभारीनी ।

**जनाईचं माहेर**

माहेरिणी ओव्यांतून तिच्या भावजीवनाचा, मनमोकळा आविष्कार झालेला दिसून येतो. सासर-माहेर पूर्वग्रहदूषित, स्वभावाप्रमाणे जरी विचार हेलकावे खात असले तरी ती सदैव दिसते कशी, गाभाऱ्यातील तेवत, जळत राहणाऱ्या नंदादीपासारखी ! प्राथमिक पाहणीत देखील येणारा लोकगीतांचा **गुणविशेष सहजता** हा होय. जात्यावरच्या व झोपाळ्यावरच्या ओव्या, कौटुंबिक इ. नाना शाखांनी विस्तारलेला पसारा बघताना सहजता हे सर्वात मोठे लक्षण असल्याचे ध्यानात येते. सहजच मनातील भावना व्यक्त होते ते, लोकगीत होते.

बायकामाणसांनी आपल्या माहेरच्यांनी केलेल्या या माहेरच्या गोष्टी आणि चंद्रमौळी झोपडीत पाहिलेलं लेकेच वैभव आपण बघतो, ऐकतो.

पण संत जनाईच माहेर कोणते ? हिच माहेर निराळंच आहे.

विठुरायानं जनाईच्या बाबतीत केलेलं अखंड सौभाग्याच माहेर खरंच भारी अपूर्वाईचं. तिचं हे जगावेगळं माहेरचं सुख आहे. जनाई माहेरी आली ती मुळी 'विठाई माऊली' करीत, आणि विठू देवाला 'माझे पंढरीचे आई' अशी हाक देतच. बालपणीच तिच्या मनानं छंद घेतला म्हणून ती आईवडिलांच्या बरोबर पंढरीला आली. 'विठूदेवातच'आईवडिलाचं माहेरचं सुख तिनं पाहिलं. एखादं लहान बाळ आईला घट्ट मिठी मारते तशी ती विठूदेवाला बिलगली. तिचं म्हणणंच मुळी

''मी देव खाईन, देव पिईन आणि देवावरी झोपेनही।''

जिथं देव तिथं मी, अशीच ही भावना ॥

विठोबा मला मूल धाडा, धावत येईन दुडदुडा ।

चरणी लोळेन गडगडा, माझा जीव झाला वेडा ॥

अशी ही जनाई पंढरीची माहेरवाशीण

अशा भावाची बरीच लोकगीते जी माहेरच्या वर्णनांची आहेत.

''माझ्या'' ग अंगणात तुळशी वृंदावन

तुळशी वृंदावन तिथं चंदनाचं बन,

संक्रातीचा सण पर्व काळाचा दिवस

भावजई सीता आधी तुळशी ववस ।

मुली तुळशीला पाणी घालताना, आपल्या भावना तिच्याजवळ व्यक्त करताना, सुखदुःख आनंदाच्या आठवणी काढताना सहजच ही लोकगीते म्हटली जायची. येथे भक्तिरसातील रुक्मिणीची भावना पांडुरंगाच्या आठवणीत व्यक्त केलेली दिसते. माहेरच्या आनंदाहून आनंद या भक्तीतून मिळतो आहे. सरोजिनी बाबर यांच्या आईला व आजीला लोकगीतांचा विशेष नाद असल्यामुळे बालपणापासूनच त्यांना लोकगीते म्हणता येत होती, असे संस्कारित मन त्यामुळे पुढे सहजतेत गाणी करू लागले.

**बहिणाबाई**

एखाद्या शेतात मोहरांचा हंडा अचानक सापडावा त्याप्रमाणे बहिणाबाईंच्या गण्पांचा शोध महाराष्ट्राला लागला. बहिणाबाई चौधरी यांनी मराठी काव्यभाषेत फार मोलाचे काम केले आहे. **'जुन्यात चमकेल आणि नव्यात झळकेल' असे त्यांचे तेज आहे.** एका निरक्षर आणि अशिक्षित शेतकरी स्त्रीने सारे रचलेले आहे हे तोंडात बोट घालायला लावील असा चमत्कार आहे. ध्वनी,

शब्द आणि वाक्ये या घटकांच्या साहाय्याने बहिणाबाईंनी विविध, विपुल, विचित्र आणि विलक्षण भाषिक रूपे वापरली आहेत. ही मराठी साहित्यातील एक अपूर्व आणि अकल्पित घटना आहे. 'प्रेम'हा विषय यांच्या कवितांतून अग्रक्रमाने दिसतो, त्यामुळेही त्यांना द्रष्टा म्हटले जाते. कारण जे लिहिले आहे ते मौलिक व आशयघन आहे. त्यांच्या 'माहेरची वाट' या गीतांतून सर्व बारकावे व आपुलकी लक्षात येते. मन हे पाखरू कसंकसं भिरभिरतंय हे जाणवत.

'माहेरची वाट' - माहेरचे दर्शन.

आज माहेराले जानं, झाली झाली वो पहाट
आली आली डोयापुढे, माझ्या माहेराची वाट
रातदान गजबज, असं खटल्याचं घर
सदा आबादी आबाद, **माझं 'आसोद' माहेर**
माझ्या माहेराच्या वाटे, रेलवाईचे फाटक
आगगाडीचं येनजानं, तिले कशाची आटक?
माझ्या माहेराच्या वाटे, 'लौकी' लागली लागली
वाटच्या रे वाटसरा, तुझी तहान भागली
माझ्या माहेराच्या वाटे, पिव्वी चिकनास खारी
पानी पावसाच्या आंधी, जाते धाव्याधाव्यावरी
माझ्या माहेराच्या वाटे, देखा बाभयींचं बन
चुल्हा लहारीच्यासाठी, घरोघरात वैतन
माझ्या माहेराच्या वाटे, डाव्या पान्याच्या लागल्या
म्हशी बसल्या पान्यात, जशा बरमाई न्हाल्या
माझ्या माहेराच्या वाटे, देखमवे चारोमेरी
गाड्या ऊसाच्या चालल्या, बुधवारच्या बाजारी
माझ्या माहेराच्या वाटे, घंट्या घुंगराचा नाद
येती जाती बैलगाड्या, धुरकरी घाले साद
मागे पोत्यातून गये, गव्हा - जवारीची धार
पाखराचा जमे बेत, दाने खाई रवाले झाले गार
माझ्या माहेराच्या वाटे, गायी म्हशीचं खिल्लार
गावामधी बरकत, दह्या दुधाची रे हेर !
माझ्या माहेराच्या वाटे, कोन्ही भिकारी-टकारी
आला भीक मांगीसनी, झोया गेली सम्दी भरी
माझ्या माहेराच्या वाटे, कोन्ही भिलीन बायजा
खाले उतारले पाटी, म्हने कटेल लेयजा
माझ्या माहेराच्या वाटे, जरी आले पायी फोड
पाय चालले चालले, अशी माहेराची ओढ
माझ्या माहेराच्या वाटे, जरी लागल्यारे ठेचा
वाटवरच्या दगडा, तुले फुटले रे वाचा
नीट जाय मायबाई, नको करू धडपड
तुझ्याच मी माहेराच्या, वाटेवरला दगड
माझ्या माहेराच्या वाटे, माले लागली गुचकी
आली उडत उडत, एक दीसले सायंकी
माझ्या माहेराच्या वाटे, मारे सोयंकी भरारी
माझ्या जायाच्याच आधी, सांगे निरोप माहेरी
"ऊठ ऊठ भीमामाय, काय घरात बसली
कर गुरमय रोट्या, लेक बहिनाई आली !"

"माहेर" शब्दच जणूकाही मधामारखा घोळलेला आहे. माहेरचे दगड, धोंडे वाट, पक्षी सुद्धा कसे आपुलकीने बोलतात हे त्यांनी त्यांच्या प्रतिभेने फारच छान या लोकगीतांत दाखवले आहे. **प्रतिभा हे त्यांना निसर्गाचे देणे आहे.** यत्नाचा व विद्येचा तेथे काहीही संबंध नाही. कोकिळेने तोंड उघडले की आपोआप संगीत वाहू लागते, प्राजक्ताची कळी उमलली की ती सुगंधाचेच निःश्वास टाकू लागते तसे 'माहेर' म्हटले प्रेम, आपुलकी, वात्सल्य, जिव्हाळा यांचे दर्शन वरील लोकगीतांत दिसते.

एक अपढीक आणि कष्टाळू गृहिणी जात्यावर दळता दळता किंवा चूल फुंकता फुंकता 'माय भीमाई माऊली, जशी आंब्याची साऊली', 'माझ्या माहेराची वाट जशी वाटे मखमल' - असले जिवंत काव्य श्वास टाकावा इतका सहजतेने कशी करू शकते ? धरित्रीच्या कुशीत झोपलेले बी-बीयाणे कसे प्रकट होते - तसे बहिणाबाईंना उत्स्फूर्त निसर्गतःच ही गीते सुचतात. मानवी जीवनाकडे बघण्याचे एक स्पष्ट आणि प्रभावी तत्वज्ञान त्यांच्याजवळ होते.

एक सासुरवाशीण शेतात कुंपणाच्या बाजूला निंदणी खुरपणी करताना गात आहे. त्याच्या बाहेरच्या बाजूला एक योगी (साधू) ईश्वराचे चिंतन करीत बसला असताना त्याच्या कानावर माहेरचे लोकगीत पडते - साधू रागावून म्हणतो - मग ती माहेरचे वर्णन करते. योगी म्हणतो -

''माझं माहेर माहेर, सदागानं तुझ्या ओठी
मगं माहेरून आली, सासराले कशासाठी ?''

सासुरवाशीण म्हणते,

अरे लगले होहाये, सांगे शेतातली माटी
गाते माहेराचं गानं, लेक येईल रे पोटी
देरे देरे योग्या ध्यान, ऐक काय मी सांगते
**लेकीच्या माहेरासाठी, माय सासरी नांदते**
अरे देव कुठे, देव कुठे? भरीसनी जो उरला
**अरे उरीसन माझ्या, माहेरात सामावला**

हयावेळी फक्त माझ्या माहेरांत देव दिसत आहे. निर्मळ प्रवाहात आपण प्रवाहाच्या लहरी सांभाळत एखाद्या फुलमाळेसारखा वहात चाललो आहोत असा भास होतो.

रातदिन गजबज, असं खटल्याचं घर
सदा आबादी आबाद, माझं असोद माहेर
गावांमधी दबदबा, बाप महाजन माझा
त्याचा काटेतोल न्याय, जसा गावामधी राजा
आई भीमाई माउली, जशी आंब्याची सावली
आम्हा ईले केलं गार, सोता उन्हांत तावली
आम्ही बहीनी आहन्याला, सीता, तुळसा, बहीना
देल्या अशीलाचे घरी, सगेसाई मोती दाना।

वाटेवरी लौकी ही छोटी नदी आहे. स्त्रियांच्या माहेरची वाट मखमलीची आहे.

'माझ्या' माहेराच्या वाटे, डाबा पान्याच्या लागल्या म्हशी बसल्या पान्यात, जशा वरमाई न्हाल्या. 'या ओळी अधिक भावतात. वारा, दगड, नदी सर्वच सासूरवाशीणीशी बोलतात.'

थोडक्यात, घरीदारी, कामात, सुखात, दुःखात, संसारात आणि निसर्गात जे जे त्यांनी अनुभवले त्यातील काव्य त्यांच्या काव्यशक्तीने टिपले व एका ऊंच पातळीवर नेऊन ठेवले. काही लोकगीतातील काव्यरचना श्रीमंत, अर्थ गर्भ व सफाईदार, मधूर आहेत. काही गीतांचा खास असा रंग आहे. लोकगीतांतून निरीक्षण शक्ती अफाट आहे. मुख्यत्वेकरून या लोकगीतांतून माहेर, माणसं, भोवतालच्या परिसर, दळणाच्या वेळच्या ओव्या, जीवनातील घटना, मळ्यातील रस्ते, सण, स्वैंपाकघर सारे जीवन या गाण्यांतून बघावयास मिळते.

थोडक्यांत, सासर माहेर या जोडशब्दांत स्त्री जीवनाच्या दोन भिन्न भूमिका सामावल्या आहेत.

माहेर-मायेचे, आईचे घर. सासर - सासरी स्त्रीच्या आयुष्याचे नवे पर्व सुरु होते. पूर्वी मुली लहान असत. त्यामुळे त्यांना 'माहेरी आणावं' हा ओढा कायम असायचा. माहेरी मुलगी, कन्या, बहिण आहे. तिच सासरी भावजय, सून, पत्नी, आई आहे. **तिला दोन्ही कुलचे नाव राखायचे आहे.** ही जबाबदारी जी उत्तम तऱ्हेने पार पाडते ती गृहिणी. त्यामुळे नम्रता, सेवाभाव, प्रेम कर्तव्यकर्म इ. तिच्याकडून अपेक्षित आहे. सासू, सून

ही नाती रामायण, महाभारत काळापर्यंत चांगली होती. सासू वृध्द झाल्यावर सुनेने गृहस्वामिनी म्हणून सर्वांवर माया करावी. कधी सासू सूनेचा छळ करते, तिला नको नको ते बोलते असे वर्णन या लोकगीतांतून आहे. तर, आई, वडिल,बहिण, भाऊ या नात्यांतील माहेरचा मोकळेपणा आनंदी आनंद ती आठवते. माहेर-म्हणजे आनंदाचे नंदनवन. सासरी - म्हणजे केवळ नवऱ्याच्या सुखासाठी ती तेथे रहाते. पती हे दैवत समजते, त्याचे घर हे तिचे शाश्वतीचे घर. विवेकी सासुरवाशीण माहेरी फारसं सांगत नसे. कारण 'सासर हेच तिचे खरं घर' असे तिला लहानपणापासून शिकवलेलं असतं.

**हेच भारतीय स्त्रीचे खरे वैभव आहे, वैशिष्ट्यआहे.**

**''अरे अरे पाखरा, जा माझ्या माहेरा''**

माहेरच्या आठवणींनी ती लहान मुलगी सुखावते. तसेच ज्योत्स्ना भोळे यांनी गायलेले व राजा बढे यांनी रचलेलं गीत -

माझिया माहेरा जा, रे पाखरा

माझिया माहेरा जा ॥धृ॥

अंगणात पारिजात, तिथे घ्या हो घ्या विसावा

दरवळे बाई गंध, चोहिकडे गावो गावा

हळूच उतरा खाली, फुले नाजुक मोलाची

माझ्या माय माऊलीच्या, काळजाच्या तोलाची ही

तुझी ग साळुंकी आहे बाई, सुखी

सांग पाखरांनो तिचिया कानी, एवढा निरोप ॥

माझ्या ग भावाची ऊंच हवेली

वहिनी माझी ग नवेनवेली

भोळ्या ग सांबाची भोळी गिरीजा ॥

माझिया माहेरा जा -

अशा भावविश्वात ही तल्लीन होते आणि सासर माहेर हाक म्हणजे **सासरचे माहेर करण्याचा प्रयत्न करते.** माहेरसारखीच ती सासरी सर्वांची लाडकी होण्याचा, छान वागण्याने प्रयत्न करते. माहेर म्हणजे स्त्रीचा मान, अभिमान, आनंदाचे ठिकाण, मनांतील नंदनवन. सर्व शुध्द नाती एके ठिकाणी उगवणारे सुगंधित नंदनवन. ह्या माहेरच्या नंदनवनासारखाचं सासरीही माझे सर्वांचे संबध असेच होऊ देत अशी हल्ली सुशिक्षित स्त्री नक्कीच प्रयत्न करते. तिच्याप्रमाणे घरातील इतर सभासदांनीही प्रयत्नपूर्वक वागायला पाहिजे, शेवटी सुखे एकमेकांच्यात गुंफलेली असतात. माझं जे माहेर आहे ते दुसरीचे सासर असते. **एकच घर सासर व माहेरचा शेला पांघरत असते.** माहेरप्रमाणेच आनंदाची बरसात सासरी करावी. म्हणते -

माहेर - हेच सासर, असं सुनेला वाटावे

कारण तिचे माहेर, सूनेच सासर हे आहे

माझे सासर - माहेरासारखे सुनेला वागवावे.

कारण तिचे माहेर - भावजयीचे सासर असते.

'सासर - माहेर एक व्हावे' असे म्हणता आले पाहिजे.

अशी लोकगीते, आपल्या रोजच्या अनुभवातील आपल्या लोकांतील गीते असल्याने मनापासून आवडतात व त्यात नवीन भर घालावी, मंगळागौरीला या माहेरच्या गीतांच्या भेंड्या किंवा गाणी आवर्जून खेळावीत असे वाटते.

**सौ. सुमेधा बेडेकर**
शिवशक्ती महर्षी कर्वे पथ,
ठाणे ४०० ६०२.
दुरध्वनी - २५४२ १४३८

# ठाण्यात : प्रभात चित्र मंडळ

*सिनेमा हा फक्त पहावयाचा नाही तर अभ्यास म्हणून पहायचा या उद्देशानी प्रभात चित्रमंडळ चालते. ठाण्यातील रसिक प्रेक्षकांसाठी आता प्रभातची शाखा ठाण्यात सुरु झाली आहे.- संपादक*

प्रभात चित्र मंडळ ही फिल्म सोसायटी गेली ३७ वर्षे मुंबईत कार्यरत आहे. ८०० सभासद, चित्रपट विषयक ग्रंथांचे सुसज्ज ग्रंथालय, महिन्याला आंतरराष्ट्रीय दर्जाचे ३/४ चित्रपट सदस्यांना दाखविणे; फिल्म सोसायटी सदस्यांसाठी 'रुपवाणी' हे मासिक आणि दरवर्षी आशियायी चित्रपट महोत्सव - एवढा प्रभातचा गेल्या ३७ वर्षातला कार्य विस्तार आहे.

ठाणे हे स्वतंत्र महानगर आहे पण वास्तवात ते मुंबईचे उपनगरच आहे. एवढ्या मोठ्या महानगरात उत्तम नाट्यगृह आहे, स्टेडियम आहे, सर्व कार्पोरेट कंपन्यांनी आपले प्रॉडक्ट विकण्यासाठी येथे दुकाने उघडली आहेत, मल्टीप्लेक्स आहेत. असे असूनही आधुनिक महानगरातील सांस्कृतिक वातावरणात फिल्म सोसायटी नसणे ही उणीव होती. ती भरून काढण्यासाठी 'प्रभात' ने आपली शाखा ठाण्यात सुरू केली आहे. डॉ. विजय बेडेकर ठाणे शाखेचे अध्यक्ष आहेत.

'फिल्म सोसायटी' ही संकल्पना सामान्य चित्रपट रसिकांना परिचित नाही. त्यातील 'सोसायटी' शब्दामुळे कोणाला फिल्म सोसायटी ही हौसिंग सोसायटी, दूध सोसायटी किंवा को-ऑपरेटिव्ह सोसायटी वाटते. 'फिल्म सोसायटी' ची संकल्पना प्रथम नीट समजावून घेतली पाहिजे.

आपल्याकडे 'सिनेमा' हा पश्चिमेकडून आयात करण्यात आला. आज चित्रपट निर्मिती आपल्याकडे प्रचंड प्रमाणात म्हणजे वर्षाला ९०० चित्रपट बनत असले तरीही कच्ची फिल्म, कॅमेरे, मेकअप साहित्य इ. कितीतरी चित्रपत्र निर्मितीची साधने आपल्याला आजही आयात करावी लागतात. साधनांसाठी आपण जसे पाश्चात्यांवर अवलंबून आहोत तसेच हॉलिवूडवर मॉडेलसाठी अवलंबून आहोत. असा हा भारतीय सिनेमा.

१९२० नंतर खऱ्या अर्थाने चित्रपटांची लोकप्रियता वाढू लागली आणि एक 'कला' माध्यम म्हणूनही या माध्यमाचा विकास होऊ लागला. सिनेमाच्या बाबतीत कला आणि गल्ला एकाच नाण्याच्या दोन बाजू झाल्या. खरा सिनेमा आणि खोटा सिनेमा यातल्या सीमारेषा पुसल्या जाऊ लागल्या. यामुळे सिनेमा ही 'कला' याचे संवर्धन करण्यासाठी आहे. लंडनमध्ये फिल्म सोसायटी स्थापन झाली नंतर तिची चळवळ बनली.

इंग्लंडमधून 'फिल्म सोसायटी'ची संकल्पना भारतात आणण्याचे श्रेय सत्यजित राय यांचे आहे. त्यांचा 'पथेर पांचाली' १९५५ साली प्रदर्शित झाला. पण त्याआधी ८ वर्षे म्हणजे १९४७ साली त्यांनी कलकत्ता फिल्म सोसायटी सुरु केली. फिल्म सोसायटी चळवळ म्हणून उभी रहायला आणखी एक तप जावे लागले. १९५९ साली 'फेडरेशन ऑफ फिल्म सोसायटीज् ऑफ इंडिया' या शिखर संस्थेची स्थापना झाली. फेडरेशनचे पहिले अध्यक्ष सत्यजित राय होते. सध्या श्याम बेनेगल अध्यक्ष आहेत.

फेडरेशनच्या स्थापनेनंतर फिल्म सोसायटी चळवळ देशभर पसरली. सध्या देशभर ३०० हून अधिक फिल्म सोसायट्या आहेत. फेडरेशनमुळे या चळवळींचे नेटवर्क देशभर आहे. आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे गेली ४५ वर्षे स्वयंसेवी संस्था ही चळवळ चालवत आहेत. देशभर नेटवर्क असलेली सातत्याने कार्यरत असलेली फिल्म सोसायटी खेरीज दुसरी कोणतीही NGO सध्यातरी देशात नाही.

चित्रपट ही 'कला' विज्ञानाने दिलेला एकमेव 'कला' प्रकार आहे. युरोपात आधी विज्ञान आले आणि

विज्ञानाच्या विकासातून १९ व्या शतकाच्या अखेरीला म्हणजे १८९५ साली सिनेमाचा शोध लागला. म्हणजे समाजात वैज्ञानिक दृष्टी कोन स्थिरावल्यावर तेथे विज्ञानाने दिलेला सिनेमा प्रकटला. यामुळे त्याची कलात्मक बाढ होऊ लागली.

भारतात नेमके उलटे घडले. १८९५ नंतर अवघ्या ६ महिन्यांत सिनेमा भारतात पोचला. पण येथला समाज सरंजामशाही प्रवृत्तीतून बाहेर पडलेला नव्हता. वैज्ञानिक शोध हे त्याला चमत्कार वाटतात. प्रेक्षकांच्या या सरंजामशाही अभिरूचीमुळे येथल्या सिनेमाची निर्मिती एक आधुनिक 'कला' म्हणून न होता सरंजामशाही प्रवृत्तीतील मनोरंजनासाठी ती राबविली जाऊ लागली. नृत्य, गाणी, फाइट्स ही सरंजामशाहीतील मनोरंजनाची साधने होती. ती सर्व सिनेमात घुसली. दुसरे महत्त्वाचे अंग म्हणजे समाजातील दारिद्र्यामुळे सिनेमा हे स्वप्नपूर्तीचे एक साधन बनले. सामान्य माणसाला काश्मीरला जाणे व चैन करणे परवडणारे नाही. पण केवळ ५/१० रु. तिकिट खर्च करून तो काश्मीरमध्ये चित्रीकरण करण्यात आलेला चित्रपट बघू शकतो. असा हा स्वप्नपूर्तीचा प्रकार आहे.

तेव्हा सिनेमा हा साहित्य, संगीत, चित्र, नाट्य, शिल्प या कलांप्रमाणेच परंपरागत कलाप्रकार नसून एक आधुनिक कलाप्रकार आहे. ही जाणीव प्रेक्षकांत रूजविण्यासाठी फिल्म सोसायटी चळवळ आहे. एका अर्थाने ही प्रेक्षक चळवळ आहे.

सिनेमांतील कलामूल्यांची जाणीव रूजवायची तर त्यासाठी या कलेची काही अंगभूत वैशिष्ट्ये समजावून घ्यायला हवीत. सिनेमा ही माणसाची प्रतिभा आणि यंत्राचा अचूकपणा यांतून सिद्ध होणारी 'कला' आहे. म्हणून सिनेमाला Art through science किंवा Man & Machine यांच्या संयोगातून निर्मिती होणारी कला असे म्हटले जाते. सिनेमा भाषेच्या पलीकडे जाणारा कलाप्रकार आहे. त्यामुळे 'पथेर पांचाली' देशाच्या सीमा ओलांडून फ्रान्समधल्या आंतरराष्ट्रीय महोत्सवात पारितोषिक मिळवू शकला. थोडक्यात साहित्याप्रमाणे सिनेमा हे प्रादेशिक कला माध्यम नसून आंतरराष्ट्रीय 'कला' माध्यम आहे. कलेचा उद्देश माणसाचे जीवनदर्शन हाच असतो. 'सिनेमा'चाही तोच असतो, असायला हवा. पण त्याला गल्ला मूल्य प्राप्त झाल्याने 'कले'ऐवजी मनोरंजन हे त्याचे उद्दिष्ट बनले आणि धंदेवाईक लोकांच्या हातात हे माध्यम गेले. भारतीय सिनेमाची ही शोकांतिका आहे. पण यावर उपाय हाच की अभिरूची संपन्न प्रेक्षक आला तर आपोआप सिनेमाचा दर्जा सुधारेल. अभिरूची संपन्न प्रेक्षकामुळेच मराठी नाट्यांचा दर्जा टिकून होता. हे मराठी रसिकांना ठाऊक आहे.

सिनेमा केवळ पहायचा नाही तर अभ्यास म्हणून पहायचा हा फिल्म सोसायटीचा उद्देश. गेल्या ४५ वर्षांतील प्रवासात देशात समांतर सिनेमा उभा रहाण्यात फिल्म सोसायटी चळवळीचा मोठा वाटा आहे. श्याम बेनेगल, मृणाल सेन, अमोल पालेकर, अपर्णा सेन, गौतम घोष, गिरीश कासारवल्ली, अदूर गोपालकृष्णन, गोविंद निहलानी हे सारे दिग्दर्शक या चळवळीतूनच पुढे आलेले आहेत. त्यांच्या चित्रपटांनी गल्लाभरू चित्रपटापेक्षा वेगळी चित्रपट संस्कृती उभी केली आहे.

चित्रपट हे दृश्य माध्यम आहे. वेगवेगळ्या दिग्दर्शकांचे व वेगवेगळ्या देशातील चित्रपट पाहून प्रेक्षकांची नजर तयार होते. त्यामुळे फिल्म सोसायटीच्या कार्यपद्धतीत दर महिन्याला चित्रपट दाखविणे हा महत्त्वाचा घटक आहे. एकदा प्रेक्षकाची नजर तयार झाली की मग त्याला खरा सिनेमा आणि खोटा सिनेमा यातला फरक सहज कळू लागतो. आस्वाद शिबीर, फिल्म कॅम्प, सिनेमाची पुस्तके वाचणे हे त्यानंतर येऊ शकते.

फिल्म सोसायटी चळवळीचा हा देशभरातला स्रोत ठाण्यात पोचावा हा 'प्रभात'ची शाखा येथे सुरु करण्यामागे उद्देश आहे.

- सुधीर नांदगावकर
५१, सनफ्लॉवर, आर्चिड कॉम्प्लेक्स, माजीवडे, ठाणे.
मोबाईल नं. : ९३ २३१४ १८९७
ई-मेल :- cinesudhir@yahoo.com

# वैदिक ऋषींचे संपत्ती विषयक मनोज्ञ विचार

*श्री सूक्तांतून ऋषींनी व्यक्त केलेले संपत्ती विषय विचार सार्वजनिक महत्त्वाचे ठरणारे आहेत. कै. पांडुरंगशास्त्री आठवलेंनी श्री सूक्तावर जी व्याख्याने दिली, त्या व्याख्यानांतील विचारांचा हा सारांश आहे. दिशाचे व्यासंगी लेखक श्री. शंकरराव मठ यांनी खास दिशा साठी केलेला हा सारांश. - संपादक*

**शक्ती -**

श्री सूक्त हे हृदय मनोहर सूक्त आहे. अर्थ गौरवाने भारावलेले याचे विवरण मूलग्राही असणे आवश्यक आहे. विचार शब्दांनी प्रगट होऊ लागले तो क्षण मानव जातीच्या इतिहासात सर्वात अधिक महत्वाचा. विचारात प्रचंड व्यापक शक्ती सुप्तावस्थेत होती याचा प्रत्यय आला आणि मानवी उत्क्रांतीचा वेग वाढला. ही शक्ती फक्त मानवालाच प्राप्त झालेली आहे. शब्दाच्या जोरावर तीनही काळावर मानव वर्चस्व ठेवू शकतो. हजारो वर्षा पूर्वी घडलेला कुरूक्षेत्रातील वृतान्त, श्री कृष्णाची गीता आजही परिणामकारक आहेत. विचाराची शक्ती, विचारांचा सौरभ आणि विचारांचे सौंदर्य ही लक्ष्मी आहे. ही कल्पना आज समाजातून गेलेली आहे. त्यामुळे आपले सगळे जीवन, आपल्या सगळ्या नैतिक कल्पना आणि मानवता डळमळीत झालेली आहे. शरीर धारणा जशी अन्नाने होते तशी मनाची धारणा, विचार आणि भाव यांनी बनते. विचार आणि भाव ही लक्ष्मी मध्ये मोडतात. अशा लक्ष्मीचा अमर्याद महिमा श्री सूक्तात गायिलेला आहे.

**वेद अक्षय संपत्ती -**

हे लक्षात घेऊन शरीरातील पंचकोश सुधारले पाहिजेत हा विचार ऋषींनी ओळखला. अन्न, प्राण, मन, विज्ञान आणि आनंदमय कोश हे समजून घेणे आवश्यक. अन्न मयाने शरीरधारणा होते. त्यापुढील कोश महत्त्वाचे आहेत. त्यांच्या विकासावर मानवतेला मांगल्य आणि आगळे मूल्य प्राप्त झाले आहे. मनाच्या साहाय्याने मनाकडूनच नियंत्रण करून पिण्डाचा ब्रम्हाण्डाशी असलेला मूळचा संबंध जाणिवेच्या कक्षात आणणारे योग शास्त्र प्रथम तयार झाले. योगाचा संबंध मनाशी मनोमयकोश हा प्रगत झाला. म्हणजे मन योगक्षम झाले. अशा मनातून जे मनन किंवा चिंतन चालते त्या चिंतनाची व्याप्ती साऱ्या विश्वाला व्यापून टाकण्या एवढी समर्थ असते. देश काळाच्या मर्यादेत न गवसणारे हे चिंतन ज्या शब्दांनी वर्ण रुपाने प्रगट होते त्या शब्दांना फार मोठे चिरंतन महत्त्व येते. अशी शब्द संपत्ती खरी अक्षय टिकणारी मानवाची संपत्ती नव्हे काय ? ही अक्षय संपत्ती म्हणजेच वेद होत. त्यांतीलच हे श्रीसूक्त.

**श्री सूक्त -**

हे सूक्त हजारो वर्षे परंपरेने आजवर आपल्याकडे चालत आलेले आहे. भौतिक युगात या सारख्या अमर सूक्तांचा विज्ञानगम्य आणि जीवनोपकारक अर्थ लुप्त होत चालल्यामुळे, आज दुर्बोध क्वचित् विपरित अर्थ मांडण्यात येतो, याचा परिणाम, ही सूक्ते निरर्थक वाटू लागली. या सूक्तांचा वास्तव अर्थ कळावा म्हणून विवरण समजावून घेणे आवश्यक आहे. आज मानव सर्व बाजूनी भीतीग्रस्त असताना श्री सूक्ता सारखे ओजस्वी विचार आपल्या समोर असणे अत्यंत अगत्याचे आहे. मानसिक धैर्य वाढीला लागेल तसेच नैतिक आणि आत्मिक धैर्य प्रबळ होईल.

श्री म्हणजे संपत्ती, सूक्त चांगले बोल, संपत्ती केवळ पैसा नव्हे प्रत्यक्ष उपभोग घेऊ शकतो तीच संपत्ती. पैसा हे त्या संपत्तीचे एक साधन. श्री सूक्ताच्या चिंतनाने,

मननाने जपादी प्रकाराने आपल्या घरातील अभूति, असमृध्दी नाहीशी होते, मनुष्य खऱ्या अर्थाने ऐश्वर्य संपन्न होतो. हे सूक्त राष्ट्रीय - खनिज, वायू, जल-संपत्ती, या संबंधीचे मौलिक आणि वास्तव विचार मांडते. हे हजारो वर्षांपूर्वी मांडलेले विचार आहेत. आजही ते अबाधित, अपरिवर्तनीय आहेत. असे सर्वांग सुंदर सूक्त आपल्या तरूण पिढीने कण्ठगत करून त्यातील विचार आत्मसात केले तर राष्ट्रीय एकात्म भावाबरोबरच राष्ट्राची सांस्कृतिक अस्मिता व भौतिक संपदा वाढेल. भारतीय शुध्द विचारांचा तेजस्वी आदर्श निर्माण होईल. अनेक कारणाने हे अमोल विचारधन उपेक्षिले जात आहे. हे शत्रूच्या भौगोलिक आक्रमणाहून दुर्भिक्षतेहून भयानक आहे. असे होऊ नये याची प्रत्येक सुज्ञ भारतीयांनी काळजी घ्यावी.

**आदिम शक्ती -**

मानवाला श्रीमंत बनविणारी, सुख समृध्दी देणारी, जी शक्ती आहे ती शक्ती प्राचीन ऋषींनी स्वतःच्या मानसिक विश्वात ज्या रूपात उभी केली त्या रूपात ती शक्ती आविर्भूत झली. त्यामुळे ती अतिशय हृद्य, आकर्षक व रमणीय रुपात आहे. शक्ती हिला कोणतेही लिंग नसते. ती आदीम शक्ती असते. या शक्तीवर स्त्रीत्व आरोपित केले गेले. तिचे स्त्रीत्व ही अतिशय हृद्यस्पर्शी, रमणीय, प्रेमळ, करुणामयी, दयाघन व सुखद आहे. ती वैदिकांची लक्ष्मी, ती समृध्दी देणारी, भाग्य जाणणारी धनधान्यांची विपुलता करणारी, वैभव आणणारी, जीवन सुखद बनविणारी पूर्ण समृद्ध अशी आहे. तीच आदीम शक्ती. तिला 'श्री' नावाने हाक मारतात. जगाची उत्पत्ती करणारी ईश शक्ती हीच होय.

**वैदिक अर्थशास्त्र -**

श्री सूक्तातील 'श्री' वैदिक आणि प्राचीन आहे. 'श्री' ही प्राचीन अर्थशास्त्रीय कल्पना आहे. ही कल्पना विशाल आणि व्यापक आहे. अर्थाबरोबर शारीरिक, मानसिक आणि सात्त्विक गुणोपार्जना अगर दैवी उदात्त मूल्यांची उपासना अनुस्यूत आहे. आज कालच्या अर्थ शास्त्रात ती आढळत नाही. दुर्बळ मनाचा माणूस धन टिकवू शकत नाही. **धन पचविण्याची मानसिक शक्ती नसेल तर विकृती निर्माण होते.** अर्थशास्त्र व उदात्त गुणांची जपणूक यांचा काही संबंध नाही असे आज मानले जाते. वैदिक अर्थशास्त्र हा अलगपण मानीत नाही. लक्ष्मी प्राप्त झाल्यावर माणूस संपन्न झाला पाहिजे अशी वैदिक लोकांची धारणा होती. ज्याच्याकडे वित्त येते त्याची बौध्दिक शक्ती किती वा कशी विकसित होईल हे ही पाहिले गेले पाहिजे. लक्ष्मीचे आवाहन करणारा न क्रोधः, न मात्सर्यः, न लोभः, न अशुभामतिः या दुर्गुणापासून दूर होऊन सद्गुणांना जवळ करणारा असावा असे श्री सूक्तात म्हटले आहे. तरच वित्त प्रभावाने ती व्यक्ती पतित होत नाही अशी वैदिक कालीन धारणा दिसते.

**भोगावर नियंत्रणे होती -**

उपभोग हा विषय अर्थ शास्त्राचा आहे अशी धारणा वैदिक काळात होती. उपभोग केव्हा भोगावयाचा कोणी भोगावयाचा याबद्दल वैदिक ऋषिंनी मार्गदर्शन केले आहे. उपभोगाबाबत नियंत्रणे ठेवलेली आहेत. **संपत्ती किती बाळगावयाची, कोणाला द्यावयाची, दानाचे स्वरूप कोणते,** यज्ञाचे स्वरुप काय, यज्ञ व दान कसे असावेत, कोणी यज्ञ करावा, हा समग्र विषय अर्थ-विनियोगाच्या विवेचनात आहे.

**वैदिक अर्थ शास्त्राची व्याप्ती -**

लक्ष्मी म्हणजे मानवाची समृध्दी होय. सांप्रतचे अर्थ शास्त्र फक्त संपत्तीचा विचार करते. जी उपयुक्त आहे व जिला मूल्य आहे याचाच विचार करते. ज्याला क्रयमूल्य नाही ती संपत्ती नव्हे अशी धारणा आहे. हवा उपयुक्त आहे पण तिला क्रयमूल्य नाही ती संपत्ती असू शकत नाही. आरोग्य ही संपत्ती नव्हे, सामाजिक औदार्य उपयुक्त पण ती

संपत्ती नव्हे. संपत्तीला क्रयमूल्य असते. सद्‌गुणांना क्रयमूल्य नाही, थोडक्यात क्रयमूल्य आहे तीच संपत्ती ही विचारधारा स्थिर झाल्याने मानवी उदात्त मूल्यांचा सर्व पायाच डगमगू लागला आहे. मानवाच्या शाश्वत व चिरंतन मूल्याचा विचार वैदिक अर्थशास्त्रात पूर्णपणे करण्यात आलेला आहे.

लक्ष्मी ही जीवन स्पर्शी देवी आहे. कारण ती मानवी जीवनाचे सुख निधान आहे. सुख या कल्पनेत जे काही येत असेल, भले त्याला बाजारात क्रयमूल्य नसेल, तरीही ती मानवसंपत्ती आहे हा वैदिक लोकांचा दृष्टिकोन श्री सूक्तांत पाहावयास मिळतो. या दृष्टीने श्री सूक्त व्यापक वैदिक अर्थशास्त्र आहे.

**व्यापक संपदा -**

श्री सूक्तात व्यक्तीची गुणसंपदा, व्यक्तीची भौतिक संपदा, व्यक्तीची विचारसंपदा, शासन, उत्पादन, सगळा विनियोग याचे सुंदर संमिश्रण म्हणजे लक्ष्मी अशी धारणा दिसते. श्री सूक्तातील लक्ष्मी भूतधागी - प्रजापालन करणारी - सर्व व्यापक आहे. सर्वांची जननी आहे. महालक्ष्मी आहे, कल्याणमयी आहे, करुणामयी आहे. दारिद्र्य दुःख भय इत्यादी नाहीशी करणारी आहे. तिच्याकडे जीवन घडविण्याची शक्ती आहे. ही लक्ष्मीची कल्पना जीवन व्यापी आहे. वैदिकलक्ष्मी जीवन घडविते. यामुळेच ज्याला क्रयमूल्य आहे ती संपत्ती अशी वैदिक संकल्पना नाही. क्रयमूल्य असो वा नसो ती सारी संपत्ती हीच व्यापक संपदा. लक्ष्मीवंताचा चेहरा फुलला असला पाहिजे कारण तेज आणि ओज म्हणजे लक्ष्मी आहे. तिला आद्या शक्ती मानून वैदिक ऋषींनी तिची अपार महिमा गायिलेली आहे.

**गतिशील अग्नी -**

या सूक्तात ऋषी अग्नीजवळ वैभव मागतात. कारण अग्नी हा देव व मानव यातील दुवा आहे. हे अग्ने तू माझ्यासाठी लक्ष्मीला बोलाव. ''जातवेद मे अग्नि आनह'' असे सांगितले जाते-

**आरोग्यं भास्करात् इच्छेत् धनं इच्छेत् हुताशनात् ।**

**विद्यां महेश्वरात् इच्छेत् मुक्तिं इच्छेत् जनार्दनात् ।**

सूर्यापासून आरोग्य, अग्निपासून धन, महादेवापासून विद्या, विष्णूपासून मुक्ती प्राप्त करून घ्यावी. अग्नी हा गतिशील आहे. आपल्या शरीरात कायाग्नी आहे, त्यालाच आपण उष्णतामान म्हणतो. शरीरात कायाग्नी आहे म्हणूनच गती आहे. शरीरात जठराग्नी आहे म्हणूनच खाल्लेले पचते. गतिशिवाय प्रगती नाही. म्हणून अग्नीला प्रार्थना केली आहे. अग्नीमुळेच अव्यक्ताला व्यक्तपणा आलेला आहे. पदार्थांची उत्पत्ती, त्यांची वृध्दी, व त्यांचा लय अग्नीच्या शक्तीनेच घडते. पदार्थ आणि द्रव्ये अग्नीच्या शक्ती मुळेच साकार झाली आहेत. म्हणूनच ऐश्वर्य व वैभव अग्नीजवळ मागितले, ही औचित्यपूर्ण गोष्ट आहे. अग्नि गृहपति आहे. कारण प्रत्येकाच्या घरात तो प्रमुख स्थान व्यापून आहे.

**विश्वातील तेज व सौंदर्य म्हणजे लक्ष्मी -**

ही आद्यशक्ती ज्या वेळी तेज व सौंदर्यधारण करून साकार होऊन आली त्या वेळच्या तिच्या विलोभनीय रूपाचे ऋषी वर्णन करताना म्हणतात - साऱ्या विश्वाचे तेज व सौंदर्य तिच्यात एकत्रित झाले आहे. ती मनाला भुरळ घालणारी आहे. हिरवा रंग, हा रंग चैतन्याचा द्योतक आहे. हिरवा रंग म्हणजे जिवंतपणा हे आदिमाते, तू पुराण असून तरुण आहेस, माते तुझ्या सान्निध्यात प्रत्येकालाच उत्साह प्राप्त होतो. कारण तू मनोहारिणी आहेस. लक्ष्मी तेजयुक्त आहे. सुवर्ण म्हणजे तेजस. म्हणून ती सुवर्ण व रजत यांची माळा धारण करते. ती चंद्रा आहे. चंद्र वनस्पति पुष्ट करतो व सृष्टीची शोभा वाढविते. लक्ष्मीचे शरीर तेजस यामुळे मानवी शरीराप्रमाणे तिच्या शरीराला विकार

नाहीत. हा फरक ऋषींनी कुशलतेने सांगितलेला आहे. वैदिकऋषि चिरस्थायी लक्ष्मीची अपेक्षा करतात.

लक्ष्मी म्हणजे प्रत्यक्ष मोहकता. ती अभिजात ऐश्वर्याच्या चिन्हांनी सालंकृत आहे. ती शोभून दिसते. तिचे चिरस्थायी रूप मला पाहिजे असे ऋषी म्हणतात. कोणत्याही वेळी न परतणारी लक्ष्मी असावयास हवी. ऋषी म्हणतात, अशी लक्ष्मी तू मला दे 'अनपगामिनी लक्ष्मी मे दे हि' एक गोष्ट इथे लक्षात ठेवावयास पाहिजे **लक्ष्मी स्वतःहून चंचल नाही पण लक्ष्मीवान चंचल होतो.** बाणभट्टाने आपल्या कादंबरीत लक्ष्मी संबंधीचे काव्यमय वर्णन केले आहे. 'लब्धा अपि खलु दुःखेन परिपालयते। लक्ष्मी आल्यावर तिला पचविणे महान् कठीण. न परिचयं रक्षति न अभिजनं ईक्षते, न रूपं आलोकते, न शीलं पश्यति, न वैदग्धं गतयति। - **लक्ष्मीचा धूर डोळ्यावर चढतो तेव्हा लक्ष्मीवान परिचय ठेवीत नाही, जवळचा ओळखत नाही, रूप, शील, शहाणपण यांना जुमानत नाही.** थोडक्यात लक्ष्मिवंताला मद चढतो.

ऋषी म्हणतात वैभव पिढ्यानपिढ्या राहिले पाहिजे. तो भगवंतापाशी अशी मागणी करीत आहे की लक्ष्मीच्या आश्रयाने येणारे दोष माझ्यात येऊ नयेत. **लक्ष्मीचा मद मला चढू नये.** म्हणून ऋषी लक्ष्मीला म्हणतात तू आमच्या घरी माता या नात्यानेच ये, चार दिवसांची पाहुणी म्हणून येवू नकोस. ऋषी अनश्वर वैभव मागत आहेत. अनश्वर ऐश्वर्य म्हणजे आत्मिक ऐश्वर्य, आत्मिक सौंदर्य, यासाठी ऋषी 'अनपगामिनी लक्ष्मी' असे संबोधून आत्म्याचे वैभव मागतात, लक्ष्मीचे वर्णन असे करतात -

**ज्ञानैश्वर्य सुखारोग्य धनधान्य जयादिकम् ।**
**लक्ष्मयस्याः समुद्दिष्टे सा लक्ष्मीति निगद्यते।**

ज्ञान पाहिजे ऐश्वर्य पाहिजे, सुख आरोग्य पाहिजे, जिच्यामुळे हे सारे मिळते लक्ष्मी म्हणतात. सुख ही मनाची समृध्दी आहे. सुख मनात आहे. **अन्यत्र मन असताना ऐकलेले कळत नाही. पाहिलेले दिसत नाही** म्हणून मन समृध्दीचे कारण आहे. मन सबळ असणे ऐश्वर्य आहे. भोगण्याची क्षमता मनावर अवलंबून आहे.

**संपत्ती बरोबर सत्ता देणारी लक्ष्मी** - मला लक्ष्मी अशी पाहिजे जी

**'चतुरंग बलोपेतां धनधान्य सुखस्थिति :।**
**अश्वारूढं अहं वन्दे राजलक्ष्मी' हिरण्मयीं ।**
**अश्व पूर्वा रथमध्यां हस्तिनाद प्रबोधिनीम्।'**

अशी लक्ष्मी पाहिजे. ऋषीने संपत्ती बरोबर सत्ताही मागितली आहे. सत्ता महान् वैभव आहे. हत्ती स्वात्म आनंदात्मक मदोन्मत्त शक्तीचे प्रतीक आहे. माणसाच्या जीवनात काहीना काही निश्चय असला पाहिजे. सामर्थ्ययुक्त लक्ष्मी असली पाहिजे. ऋषी शक्ती उपासक आहेत. म्हणून महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वती यांची उपासना करीत असत. राजलक्ष्मी, ज्ञानलक्ष्मी, आत्मलक्ष्मी या सर्व लढाईतूनच मिळतात. **दृढनिश्चयी माणूसच लढाई करतो. अध्यात्मातही लढाई आहेच. सर्वत्र लढाईतूनच वैभव वाढलेले दिसते.** उच्च मानवी मूल्यांचे रक्षण नेहमी शक्तीमुळेच झालेले आहे हे आमच्या पूर्वजांच्या पक्केपणी ध्यानात होते. **शक्तीलाही ते वैभव मानीत.** आपले देवही सायुध व सशक्तिक आहेत. आपल्या संस्कृतीने अश्व पासून इतिपर्यंत सखोल अभ्यास केला आहे. उच्च मानवी मूल्ये उच्च शक्तीनेच रक्षिली जातात. मानवी मूल्ये शक्तीच्या आधाराने उभी राहतात. समृध्दी वाढवावयाची असेल तर राज्य असले पाहिजे. राज्य टिकवावयाचे असेल तर शक्ती आवश्यक. कौटिल्य म्हणतो -

**धर्मस्य मूलं अर्थः।**
**अर्थस्य मूलं राज्यं।**
**राज्यस्य मूलं इंद्रियजयः।**
**इंद्रियजयस्य मूलं वृध्दोपसेवा।**

वैदिक ऋषी आदी शक्तीकडे लक्ष्मीची मागणी करीत आहेत. मला संपत्तीबरोबर सत्ताही पाहिजे. राजलक्ष्मीबरोबर ज्ञानलक्ष्मीही असली पाहिजे. मी बिघडू नये म्हणून मला ज्ञानलक्ष्मीही पाहिजे.

**लक्ष्मी आर्द्र असावी -**

ती प्रेमळ असली पाहिजे. माझे घर तिला तिचेच वाटले पाहिजे म्हणजे ती स्वतःच्या घरी प्रेमाने आणि आनंदाने राहील. व घरातल्यांची लेकराप्रमाणे काळजी घेईल असे ऋषींना वाटते. लक्ष्मी तृप्त असावी.

जी स्वतःच तृप्त आहे ती इतराना तृप्त करू शकते. जिच्या डोळ्यात आशाळभूतपणा नाही ती इतराना समाधानी करू शकते. भोगानंद व आत्मानंद असे दोनही प्रकारचे आनंद लक्ष्मीच देते. भावानंद हा मोठ्यातला मोठा आनंद आहे. ही लक्ष्मी पद्मावर बसलेली आहे. **पद्म अनासक्तीचे द्योतक आहे.** पद्मवर्णा अशी ती आहे. धवल व अरूण वर्ण यांचा एकत्र मिलाफ होतो तेव्हा कमलाचा वर्ण बनतो. धवलवर्ण जीवन स्वच्छतेचे द्योतक व अरूण लाली सौंदर्याचे द्योतक.

हे लक्ष्मी माते मी तुला शरण आलो आहे. तू आल्हादकारी, संतोषकारी आहेस. तू तृप्त असल्याने पूर्ण संतोषाची पूर्तता तुझ्या ठायी आहे. वित्त एक शक्ती आहे आणि मानवाने ती प्राप्त केली पाहिजे. असा वैदिक ऋषींचा आग्रह आहे. माते तू आमचे भौतिक दारिद्रय दूर कर तसेच मानसिक दारिद्रयाचाही नाश कर, त्या शिवाय माझे जीवन सौंदर्य फुलणार नाही.

माते तुझ्या तपामुळे हा बिल्ववृक्ष उभा राहिला. या बिल्ववृक्ष फळाला श्रीफळ संबोधण्यात आले. **श्रीफळ म्हणजे नारळ हा अलिकडचा अर्थ आहे.** लक्ष्मीने ज्या झाडाखाली बसून तपश्चर्या केली त्या झाडाचे फळ हे बिल्वफळ. यालाच श्रीफळ म्हणतात. ही फळे माझे अज्ञान आणि दुःख, आत असलेली माया, अंतर्गत अज्ञान हे नाहीसे होण्यासाठी साहाय्य करोत. माझी बाह्य इंद्रिये कधीही अकार्यक्षम न होवोत. जीवनातून लाचारी निघून जाणे ही मोठ्यातली मोठी गोष्ट आहे. ही मानवी जीवनातली उच्च अशी उन्नती आहे. बेलवृक्षासारखी बसून तप केले तर लक्ष्मी लवकर प्रसन्न होते अशी मान्यता आहे. कारण तो वृक्ष लक्ष्मीनेच लावलेला आहे.

**सुराष्ट्र -**

या राष्ट्रात मी जन्मलो आहे म्हणून मला कीर्ती आणि वैभव दोन्ही पाहिजेत. दिगंत कीर्ती आणि यश या धनाचे अक्षयभांडार व भाग्य माझ्याजवळ आली पाहिजेत हे सर्व मला पाहिजे, कारण मी या राष्ट्राचा नागरिक आहे. ऋषींनी इथे भारतीय नागरिक उभा केला आहे. **भारतात राष्ट्र ही कल्पना फार प्राचीन काळापासूनच आहे.** ती कल्पना विशाल आहे. **'समुद्र पर्यंतायाः पृथिवी एक राष्ट्र'** समुद्रापर्यंत पृथ्वीवर एक शासन असले पाहिजे ही संकल्पना भारताची आहे. त्याही वेळी साम्राज्य वैराज्य, पारमेष्ठीराज्य, महाराजा या सर्व प्रकारची शासन व्यवस्था होती. **समुद्र पर्यंताया पृथ्वी एकराष्ट्र ही एकात्म शासनाची कल्पना उभी केली.** सर्व राज्यांनी आपआपल्या परी रहावे कोणीही एकमेकावर आक्रमण करू नये अशी ही योजकता पूर्ण कल्पना आहे.

राष्ट्राची वृध्दी सांगताना ऋषी म्हणतात सरळमार्गावरील निष्ठा पाहिजे. ही **निष्ठा उग्र असली पाहिजे.** उग्रता म्हणजे शौर्य, वीर्य, धैर्य. राष्ट्रातील युवकात वीर्य व शौर्य उभे केले पाहिजे. अस्मिता उभी केली पाहिजे. तप-सहनशीलता, तसेच राष्ट्रात ज्ञान वाढले पाहिजे. यज्ञ-श्रेष्ठांचे विचार आत्मसात केले पाहिजेत. मी या राष्ट्रात जन्मलो म्हणून सर्व प्रकारे वैभव प्राप्त झाले पाहिजे.

**कीर्तिः मतिः धृतिः पुष्टिः समृध्दिः तु तुष्टिरेवच**
**श्रुति : बलं स्मृतिः मेधा श्रध्दा आरोग्य जयादिकाः।**

वरील सर्व लक्ष्मीच्या दासी आहेत. लक्ष्मीच्या

बरोबर ही सारी येतात. थोडक्यात कीर्ती, बुध्दि, धैर्य, पुष्टी, समृध्दी, तुष्टी, बल स्मृती, मेधा, श्रध्दा आणि आरोग्य व जय या साऱ्या गोष्टी आल्या पाहिजेत. **राष्ट्राबद्दलची कल्पना आपल्या वैदिक संस्कृतीत जेवढी आहे तेवढी दुसऱ्या कोणत्या ठिकाणी नाही.** जिवंत राष्ट्र म्हणजे काय ते वैदिक वाङ्मय समजावते. माझ्या राष्ट्राची काही एक जीवन प्रणाली आहे, विचारधारा आहे. दहा दहा हजार वर्षे या विचारधारे मध्ये आमचे पूर्वज लहानाचे मोठे झालेले आहेत, त्यांनी वैभव मिळवलेले आहे, मोडले, पडले आणि चढलेही आहेत. अशा प्रकारची एक विचार धारा आहे. अशी मजबूतता नसेल तर राष्ट्राची समृध्दी कुठून ?

अभाव म्हणजे अलक्ष्मी, प्रयत्नांनी लक्ष्मी-वैभव -प्राप्त होते. भाव प्रयत्न साध्य आहे. अभाव क्षुधा पिपासा यांनी भरलेली आहे. माते मी क्षुधा आणि पिपासा काढून टाकण्याचा प्रयत्न करीन. तू मला मदत कर. **मी आळशी पणा टाकून देतो व कामाला लागतो.** मी भूक व तहान शुध्द करीन. भौतिक भूक मिटून गुणाची भूक लागते ही शुध्द भूक होय. पर्वतासारखी स्थितप्रज्ञता, सागरासारखी गंभीरता आकाशासारखी विशालता माझ्यात असली पाहिजे जड व चेतना या सर्वांचे गुण माझ्यात आणीन.

**गंधवती पृथ्वी -**

''गंधद्वारां दुराधर्षां'' या मंत्रात ऋषी भूमीची विपुलता मागतात. ही भूमी गंधवती आहे. पृथ्वीला गंधवती म्हणतात. जे जे पृथ्वितत्त्व त्याला त्याला गंध आहे. तो सुगंध वा दुर्गंध असू शकेल. निरनिराळ्या ऋतूत पृथ्वीला वेगवेगळा गंध असतो. पृथ्वी दुराधर्षा आहे. प्रयत्नानेही तिला आकर्षित करू शकत नाही वा पृथ्वीला कोणी उचलून घेऊन जाऊ शकत नाही. नित्यपुष्टां-ती नित्य सर्वांचे पोषण करणारी आहे. भूमीने मला पुष्ट केले पाहिजे म्हणून मी तिची नित्य मशागत करतो. करीषिणीम्-शेणी (गाईचे सुके शेण ही शेण खताचे मोठे काम करते व भूमी सकस करते. हे शेणखत शेतीला चांगले असते. मी तिची सेवा अशा प्रकारे करेन.

**मानसिक वैभव -**

हे लक्ष्मी, तुझ्या प्रभावाने माझे मनोरथ व संकल्प आणि वाणीचे सत्य मला प्राप्त होवो. हे महत्त्वाचे मनोरथ आहे. माझ्या मनाचे मनोरथ दिव्य आणि भव्य व्हावेत, संकल्प तेजस्वी व्हावेत आणि वाणीला प्रामाणिकता प्राप्त व्हावी, मानवी जीवनात मनाला एक अनन्य साधारण स्थान आहे. मनाचा शरीरावर परिणाम होतो. मात्र मनाकडे उपेक्षा दृष्टीने पाहिले जाते. मनाला शक्तिशाली बनविले पाहिजे, सुसंस्कारी बनविले पाहिजे. स्थिर व समाधानी बनविले पाहिजे. मनामध्ये अद्‌भुत सामर्थ्य आहे, संस्काराची अक्षय स्मृति मंजूषा आहे. मनाचे मनोरथ आणि संकल्प यांच्यावर जीवन लक्ष्मीचा प्रभाव असतो. आपले सारे जीवनच मनोरथांनी व्याप्त असते. जीवनात जे विचार अवलंबून आहे कित्येकहूना पुनर्जन्मही अवलंबून आहे हा निसर्गाचा नियम आहे हा अटल सिध्दांत आहे. 'यथा मतिः तथा गतिः।

मला वाणीचे सत्य प्राप्त व्हावे. कुविचाराने मानसिक अधःपतन होते. सुविचार स्थिर राहिले तर मन ऊर्ध्वगतीला जाऊ लागते. चांगल्या विचारात इतकी शक्ती आहे. विचारांनी माणूस बदलतो. विचार शब्दांनी व्यक्त होतात. शब्दात शक्ती आहे, वाणीत सामर्थ्य आहे, भाषा मोठी समृध्द आहे. माणसाला संस्कारी बनवावयाचे असल्यास त्याचे विचार बदलावे. तरच तो सुधारतो. 'सदा सर्वदा सत्य वाचे वदावे' ही गोष्ट तेव्हाच घडते. यातूनच वाणीचे सामर्थ्य प्रगट होईल. माणसाचे मन संवेदन क्षम बनल्यासच तो सर्व भूतमात्रावर - मानव, पशु, पक्षी, आदींवर प्रेम करू लागतो. तेव्हा त्याचे जीवन समृद्ध होते.

इंदिरापुत्रांना आवाहन -

कर्दम हा महान शक्तिशाली ऋषी आहे. तो अतिशय ज्ञानी व निष्ठावान आहे. तो लक्ष्मीवान होता. लक्ष्मीचे कर्दमावर पुत्रवत प्रेम आहे. त्याच्याजवळ लक्ष्मी नित्यवास करते. म्हणून लक्ष्मीला उद्देशून ऋषी म्हणतात. - माते तू कर्दमाला घेऊनच माझ्या घरी ये. लक्ष्मीचा दुसरा पुत्र - चिल्कीत यांचीही स्तुती करून लक्ष्मीला ऋषि बोलवतात. - हे माते तू माझ्या घरी स्थिर हो. व चिल्कीतासह माझ्याकडे वास कर. चिक्लीताला जलवैभवा साठी बोलावले आहे. जल महान् वैभव आहे. सृष्टी निर्मिती पूर्वी जल होते तिच्या लयानंतरही जल राहणार आहे. जल देवता आमच्या घरात स्नेहयुक्त आणि मंगल कार्ये करीत राहो. जल अधिष्ठात्रीची देवता आहे. जलामुळेच पृथ्वी सस्यशामला होते.

लक्ष्मीचे वाहन हत्ती आहे. हत्ती स्वतःच्या सोंडेने लक्ष्मीवर नित्य अभिषेक करतो, हत्ती ऐश्वर्यांचे प्रतीक आहे. गजानन लक्ष्मी हे भाग्यवंताचे लक्षण ऋषी म्हणतात. माझ्या दारात गजान्तलक्ष्मी यावी. हत्तीचा दुसरा गुण तेजस्विता. हत्तीला चुचकारून प्रेमाने खावयास घालावे लागते. हत्तीला भविष्याचे ज्ञान असते. तो सर्वांचे भवितव्य वाचतो. वारस नसलेला राजा मरण पावला असता हत्तिणीच्या सोंडेत माळ दिली जाते, तिला नगरात सोडून दिले जाते. ती ज्याच्या गळ्यात माळ घालील त्याला राजा करण्यात येत असे. कारण हत्ती भविष्य वेत्ता आहे. जो उद्याचा विचार करतो तो बौध्दिक श्रीमंत होय.

रंगाचे ज्ञान ऋषींना फार चांगले होते काम क्रोधारिक विकारांना एक प्रकारचा रंग असतो तो चेहऱ्यावर दिसतो. प्रत्येक विकाराबरोबर चेहऱ्याचा रंग फिरतो. तो ओळखता येतो. हे भारतीय ऋषींना ज्ञात होते. मनोविश्लेषण शास्त्रात हे शास्त्र अंतर्भूत आहे. पिंगल वर्ण म्हणजे लाल व पिवळा या दोन रंगाचे मिश्रण हे दोन्ही वर्ण सामर्थ्य व समृध्दि यांचे द्योतक आहेत. ऋषींनी पाहिली ती लक्ष्मी सामर्थ्यवान व समृद्ध होती. म्हणून तिला पिंगला असे म्हटले. तिच्या हातात धर्म दण्ड आहे अशी लक्ष्मी माझ्या घरात यावी. मला नियमन करणारी लक्ष्मी यावी. भौतिक ऐश्वर्याची गंगा, मानसिक ऐश्वर्याची यमुना यांना संगम होताच कृतार्थतेची सरस्वती उद्‌भवते तीच अनपगामिनी लक्ष्मी होय. माझ्या घरात लक्ष्मीचा त्रिवेणी संगम व्हावा व त्यामुळे माझे जीवन कृतार्थ व्हावे.

या पंधरा ऋचा जो माणूस सतत जपतो त्याच्या घरात कायमची टिकणारी लक्ष्मी वास करते. ज्याची काया वाचा शुध्द आहे जो अथक प्रयत्नशील आहे त्याला कृतार्थ लक्ष्मी प्राप्त होते. मन संवेदनक्षम व्हावे, सारी निर्घृणता नष्ट व्हावी विज्ञान प्रगती बरोबर मनःसामर्थ्य वाढीला लागून ते विकसित व्हावे, मानव स्वतः चारित्र्य निष्ठ बनावा, त्यागाची दीक्षा घ्यावी, स्वच्छ व पवित्र जीवन बनवावे तेव्हा खरी शान्ति, पुष्टि व तुष्टि अनुभवाला येईल.

लक्ष्मीचे तोंड कमळासारखे आकर्षक आहे. कमळ आनंदवर्धन, सौख्यवर्धन करण्याचे कार्य करते. माते तुझी सेवा करतो. सर्व सौख्य मिळो असा आशीर्वाद दे. तुझे चरण कमळ माझ्या घरात राहू देत. लक्ष्मी तू सर्वांना प्रिय आहेस तू विश्वप्रिया आहेस तू सर्व प्रजेची आई आहेस मला दीर्घायुष्य दे. मला तुझी सेवा करत जगावयाचे आहे. श्री सूक्ताचा अर्थ ध्यानात घेऊन जगणाऱ्यांकडे संपत्ती येते. हे भगवती हरिप्रिये मनाज्ञे तू विष्णुला अत्यंत प्रिय आहेस. तू माझ्यावर प्रसन्न हो. माझी बुध्दी शुध्द कर. आदिशक्ती जगत् जननीचे हे अत्यंत सुंदर स्तोत्र आहे. समजून गावे, गाताना जननीचे स्वरूप डोळ्यासमोर यावे. माते तुला नमस्कार करतो.

(कै. श्री. पांडुरंगशास्त्री आठवले यांच्या श्रीसूक्तावरील व्याख्यानांचा सारांश)

- शं.बा.मठ
६, कुमार आशिष,
राम मारुती रोड, ठाणे - ४०० ६०२.

# ''२१ व्या शतकातील सार्वजनिक ग्रंथालये''

सार्वजनिक ग्रंथालय ही संकल्पनाच मुळी त्याच्या कार्याविषयी तोंडओळख करून देते. तरी ही अशी सगळ्यासाठी खुली असणारी माहिती-मनोरंजन सेवा खालील प्राथमिक गोष्टींवर अवलंबून आहे.

१) संस्थेचे स्वरूप

२) संस्थेसमोरील वर्तमान व भविष्यकाळी योजना

३) प्रशासकीय कामकाज

४) प्रगतीचे आढावे, दर्जा, आणि नियंत्रण

५) परिणाम

२५ वर्षापूर्वी ज्यावेळेस मी आमच्या गावातल्या सार्वजनिक वाचनालयात लहान मुलांची नियतकालिक कादंबऱ्या (फास्टर फेणे वगैरे) वाचावयास जात असे. त्या वेळेस तिथल्या कर्मचारी आणि ग्रंथपालाचे रोखुन बघणारे डोळे मी आज ही विसरू शकत नाही. कदाचित तेव्हाच मनाने निर्णय घेऊन टाकला होता कि आपण ही कधी काळी ग्रंथपाल होऊ शकलो तर ही सर्व परिस्थिती बदलवू शकू. जणू काही त्या वेळेने मला संमतीच दिली आणि ज्या २१ व्या शतकात आपण रहात आहोत त्याने माझ्या मनीचे ग्रंथालय जणू जिवंतच केले आहे.

ग्रंथालय म्हणजे पुस्तकांचे भांडार ही कल्पना आता कागद विरहीत ग्रंथालये अशी होऊ लागली आहे. सर्वात उत्तमोत्तम सेवा देणारी आजच्या घडीला माझ्या डोळ्यासमोर आहे ती ''ब्रिटीश कौन्सिल लायब्ररी'' आता आपण म्हणाल कि ह्याची प्रत्येक गोष्ट, जरूरी निर्मिती, संचालन वगैरे वगैरे सगळे अमेरिकेतून हालत असते. पण मग २१ व्या शतकातील भारतीय सार्वजनिक ग्रंथालय का बरे आपल्या स्वप्नातून साकारत नाही. अर्थात हा मुद्दा वेगळा आहे.

२१ वे शतक हे मुळातच औद्योगिक प्रणाली, संगणक त्यातील तज्ञ, मुक्त अर्थव्यवस्था, शिक्षणाची जवळ-जवळ ६०० वेगळी-वेगळी क्षेत्र, अत्यंत हुशार आणि संवेदनशील विद्यार्थी मग तो वयाची अट न ठेवणारा असे आहे. माहिती तंत्रज्ञान ह्या क्षेत्राची आघाडी तर दररोज वर्तमानपत्रांचे रकाने भरून प्रसिद्ध होत असते. अशा ह्या माहितीच्या आघाडी क्षेत्रात मान्य स्थान असणारे एकमेव ठिकाण म्हणजे ही **''सार्वजनिक ग्रंथालये.''**

सार्वजनिक ग्रंथालये ही सरकारच्या मदतीशिवाय पुढे येऊ शकत नाही ही एक महत्त्वाची म्हटली तर अडचण किंवा मदत आहे. २१ व्या शतकातील सार्वजनिक ग्रंथालयांनी केवळ वाचकांच्या मनोरंजनासाठी अथवा वृत्तपत्रवाचनासाठीच सेवा मर्यादित न ठेवता जास्तीत जास्त काटेकोर पध्दतीने आपल्या सेवांचे नियोजन करून वाचकांना सहज साध्य त्या उपलब्ध करून देता आल्या पाहिजेत.

२१ व्या शतकातील सर्व अटी पाळणारे उत्तमोत्तम सार्वजनिक ग्रंथालय म्हणजे ''लोकमान्य सेवासंघ वाचनालय, विलेपार्ले.'' हया ग्रंथालयाने त्यांच्याच सभासदांनाच नव्हे तर सगळ्यांना हव्या तशा पध्दतीत ह्या सेवा उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यांची सगळी पुस्तक ग्रंथ भांडार आज संगणकामध्ये नोंदवलेली आहेत. सामान्य वाचकाला सुध्दा तेवढेच महत्व आहे कि जेवढे एखाद्या अभ्यासकाला.

२१ व्या शतकातील सार्वजनिक ग्रंथालयात वाचक स्वतः आपल्याला हव्या असलेल्या पुस्तक संदर्भ ग्रंथाना

शोधू शकतो. कारण ह्या शतकातील ''वाचकांसाठी पुस्तकालय व वाचकांचा वेळ वाचवणे'' ह्या दोन डॉ. रंगनाथन ह्यांनी सांगितलेल्या तत्त्वांवर बेतलेली आहे. पुस्तक, मासिक, संदर्भ ग्रंथ, रिपोर्टस्, वगैरे-वगैरे संगणकांमध्ये नोंदलेल्या असतात. त्या साठी-माहिती-तंत्रज्ञानाच्या जोडीने नवीन नवीन सॉफ्टवेअर बाजारात उपलब्ध असतात. युनेस्को, नॅशनल इनफॉरमेशन पॉलीसीज्, माहिती-तंत्रज्ञान प्रसार व प्रगती, सरकार, सार्वजनिक संस्था, मोठ-मोठ्या उद्योग-संस्था सतत ह्या सेवेद्वारे वाचकांच्या समीप येऊन त्यांच्या सोयींनी युक्त अशी ग्रंथालये बनावीत म्हणून प्रयत्नशील आहेत.

हया ग्रंथालयातील एकूण प्रकाशकांची वर्गवार विभागणी केली जाते. सामान्य वाचकासाठी असणारा विभाग फक्त दैनंदिन माहिती, वृत्तपत्रे, जाहिराती, मासिके, त्रैमासिके, नियतकालीके, कादंबऱ्या-कथा नाटके इत्यादींनी समृद्ध असतात. त्यांचे वाचनकक्ष साधारण त्यांना बसून चर्चा करायची असल्यास करता येतील असे असतात. त्यांच्यासाठी एक ''सूचना-पेटी-फळा'' लावलेला असतो, ज्यायोगे ते आपल्या गरजा वाचनालय चालविण्याऱ्यांपर्यंत पोहचवू शकतील.

अभ्यासु व गरजू विद्यार्थ्यासाठी क्रमिक तसेच संदर्भ जर्नल्स्, ग्रंथ-मार्गदर्शनपर भाषणे, वगैरेंचे आयोजन करून त्यांना त्या अल्पदरात उपलब्ध करून देणे.

वृद्धांसाठी-लहान मुलांसाठी स्वतंत्र विभाग असणे ही देखील सार्वजनिक वाचनालयांची गरज आहे. लहान मुले जिज्ञासु असतात, म्हणून त्यांना वाचनाची गोडी कशी लागेल, कशा गोष्टीतून ते दूरदर्शन पासुन दूर व वाचनालयांकडे वळतील असे कार्यक्रम आखणे वगैरे.

हल्लीचे युग स्पर्धा युग आहे. प्रत्येक जण आपले नाव कसे सगळ्यांच्या तोंडी होईल हे पहात आहे. प्रत्येकाला त्याच्या कलेचे मोल हवे असते. कौतुक हवे असते. मला वाटते की सार्वजनिक वाचनालये ह्या सगळ्या गरजा पुऱ्या करू शकतात. हल्ली आकारमानापेक्षा गुणांना महत्त्व आहे. हे जग मार्केटिंगच्या मागे धावत आहे. प्रत्येक गोष्टींची जाहिरात व त्याचा खप ह्यामागे जनता धावत आहे. मग माहिती क्षेत्रातही मागे राहून कसे चालेल. ''माहिती'' हे एक प्रॉडक्ट समजून त्याचा खप कसा होईल व कोणत्या सोप्या मार्गाने तो सामान्य जनांमध्ये पोहचेल हे बघितले पाहिजे. सार्वजनिक वाचनालये हे काम अगदि सहजपणे करू शकतात.

मुख्य म्हणजे त्यांचा विस्तार माहिती-तंत्रज्ञानावर आधारितच हवा आहे. फक्त पुस्तक वाचा व परत करा ही संकल्पना सोडून देऊन त्या पुस्तकाच्या लेखकाची माहिती ते त्यांच्या आतापर्यंत प्रकाशित झालेल्या पुस्तक-यादी सकट वाचकांना जाणून द्यावी. ही सेवा जर त्या पुस्तकालयात असेल तर वाचक नक्कीच तिथे आकृष्ट होईल. पुस्तकांमधील संदर्भांचा केवळ झेरॉक्स-सेवा उपलब्ध असे न रहाता ते इलेक्ट्रॉनिक फॉर्म म्हणजे फ्लॉपी, सीडी वगैरे प्रकारात घेता येणे शक्य केले पाहिजे. जर एखादा संदर्भ त्या वाचनालयात उपलब्ध नसेल तर सार्वजनिक वाचनालयांचे नेटवर्क असलेल्या ठिकाणी ते कुठे उपलब्ध होईल हे सांगणे तितकेच महत्त्वाचे ठरेल.

कला-संस्कृती-सण-उत्सव ह्यांचे महत्त्व व त्याच बरोबर त्या संदर्भात येणारे अंधज्ञान दूर करणे, ह्या साठी निरनिराळे शोज्-विषयतज्ञ हयांची व्याख्यान ठरविणे, अनेक माहिती पट-व्याख्यानमाला निरनिराळे समाजोपयोगी उपक्रम हाती घेणे. हया गोष्टींवर भर द्यावयास हवा.

२१ वे शतक हे संगणक-माहिती-तंत्रज्ञानाचे आहे. त्यानुसार वाचनालय हि आपले स्वरूप व सेवांचे योग्य नियोजन करावयास हवे. सीडी-व्हीसीडी, मायक्रोफिल्मिंग, इंटरनेटसेवा वाचनालयांचे नेटवर्क ह्या सगळया नवीन शोधांबद्दल व त्याच्या आपल्या वाचनालयात होणाऱ्या

उपयोगाबद्दल वेळोवेळी वाचकांना जागृत करावे.

ह्या लायब्ररीज् कागदविरहीत असतील म्हणजे काय? तर शक्य झाल्यास जेवढे फंड अस्तित्वात असतील तर अशी वाचनालये आपल्या वाचकांना "इलेक्ट्रॉनिक पुस्तकं" वाचावयास उपलब्ध करून देऊ शकतात. नुकतेच दिनांक ६ एप्रिलच्या "टाईम्स ऑफ इंडिया" त सुरू झालेल्या एका "Sitting in Library" ह्या वाचनालयाविषयी वाचले. खुप कौतुक वाटले त्या व्यक्तिचे जिने कुलाबा सारख्या भागात अशा प्रकारचे हे वाचनालय उभे केले आहे कि तिथे अगदि लहान मुलांपासुन ते अगदि आई-वडिल/आजी आजोबापर्यंत सगळेच रमतील. उगाचच आपण आई-वडिल म्हणत असतो कि मुले दूरदर्शन समोर बसून रहातात व वाचन विसरतात. पण त्यांना आवडेल अशा वातावरणात आणि गोडी लागेल अशी पुस्तके मग ती स्क्रीनवर असोत किंवा शेल्फवर किंवा एखाद्या सीडीत का बरे गोडी लागणार नाही. हल्लीची पिढी फार हुशार व सक्षम आहे. ही पिढी घडविणे ह्या वाचनालयांच्याच हातात आहे. त्यांना समाजाने पुरस्कृत करावे. "गाव तिथे वाचनालय" ह्या बरोबरच जिथे सगळे मिळते ते वाचनालय अशी धारणा वाचकांच्या मनात ठसविणे हे वाचनालयांचे उद्दिष्ट असावे.

निरनिराळ्या विषयांमुळे वाचनालयांचे सभासद वाढत असतात; म्हणून त्यांच्यासाठी ही वाचनालये प्रसन्न वातावरणात, भरपुर प्रकाशासहित, धूळविरहित, आणि मुख्य म्हणजे सेवा प्रणित असावीत. ग्रंथपाल व त्यात कर्मचारी ह्यांनी आलेला वाचक हा आपला कस्टमर नसून देव आहे, साध्य आहे. ह्या भावनेतून त्यांच्याशी संवाद करावा. त्यांना नवीन प्रणालींचा वापर माहिती नसल्यास त्या संबंधी जागृत करावे. आपले वाचनालय त्यांच्यासाठी काय-काय घेऊन सज्ज आहे हे त्यांच्यापर्यंत पोहचवावे. आकर्षण वाटेल असे वातावरण ह्या २१ व्या शतकांतील पुस्तकांमध्ये आहेच आहे. फक्त समाजातील ह्या पिढीला तुमच्याकडे कसे वळवता येईल हे जाणून घेतले पाहिजे.

ह्या पुढे जाऊन ही वाचनालये कदाचित छोटया - छोटया मोबाईल वर सुद्धा उपलब्ध होतील. कारण हे तंत्रज्ञान इतक्या वेगाने पुढे जात आहे कि वाचकाला हातातल्या हातात हवी असलेली माहिती कुठल्या वाचनालयात असेल ते लगेच समजले. दिवसें-दिवस महाग होत चाललेल्या पुस्तकांच्या किंमती ह्या सामान्य वाचकासाठी घेणाऱ्या संग्रहात परवडनाशा झाल्या आहेत. त्यामुळे त्याचा ओढा निश्चितच त्या वाचनालयांकडे वळत आहे.

म्हणूनच सार्वजनिक वाचनालयांनी ह्या शतकांची आव्हाने स्वीकारून त्यानुसार सर्व सुविधा उपलब्ध कराव्यात ही अपेक्षा असते. सुरवातीला सांगितल्याप्रमाणे उत्तम सार्वजनिक वाचनालय असलेले ब्रिटीश कौन्सिलचे ग्रंथालय व लोकमान्य सेवा संघ ही वाचनालये काय-काय सेवा देतात हे सरकारी ग्रंथालयांनी अभ्यासाने व त्यायोगे गरजू विद्यार्थ्यांना, समाजातील इतर गरजवंताना मदत करावी. शेवटी ही वाचनालयेच समाजाचे आरसे आहेत, ज्यात गरजवंत आपल्या प्रतिमेत कुरवाळत असतो.

**तर मग केव्हा करूया सुरवात ह्या कागदाविरहीत वाचनालयांना !**

**सौ. निशा सरदेसाई**
डी. ४७, रिजर्व बँक क्वार्टर्स,
नॉर्थ अॅव्हेन्यु, सांताक्रुझ, (पश्चिम)
मुंबई - ४०० ०५४.

# तंत्रनिकेतनात झालेली महत्त्वपूर्ण विषयावरील राष्ट्रीय परिषद

२७, २८ ऑगस्ट २००५ रोजी आमच्या थोरले बाजीराव पेशवे सभागृहात पर्यायी उर्जा स्रोत या विषयावर झालेल्या राष्ट्रीय परिषदेचा हा सविस्तर वृतान्त, यातील सहभागी शास्त्रज्ञ, त्यांचे विषय यांची नोंद रहावी या दृष्टीने वृतान्त तपशीलात देण्याचा प्रयत्न आहे. शक्य असेल तेथे मूळ इंग्रजीचे मराठीत भाषांतर करण्यात आले आहे. - संपादक

आमच्या तंत्रनिकेतनातर्फे 'पर्यायी उर्जा स्रोत' या विषयावर राष्ट्रीय परिषद आयोजित केली होती. उत्पादने व प्रकल्पांच्या प्रदर्शनाचेदि. २६ ऑगस्ट रोजी उद्घाटन करून परिषदेस सुरुवात झाली. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त श्री. संजय सेठी व पितांबरी उत्पादनांचे प्रमुख कार्यकारी अधिकारी व संचालक श्री. रविंद्र प्रभुदेसाई उपस्थित होते. या विषयातील तज्ञ, शिक्षण क्षेत्रातील जागरूक तरुण पिढी यांना एकत्र आणून एक व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याबद्दल श्री. सेठी यांनी समाधान व्यक्त केले. या संदर्भात या संस्थेस मदत करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. त्यांच्या हस्ते स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. श्री. रविंद्र प्रभुदेसाई यांनीही महत्वाच्या विषयाबाबत जागृती घडवून आणत असल्याबद्दल प्रशंसोद्गार काढले. प्रदर्शनात १२ उद्योजक व १२ प्रकल्प प्रतिकृतींचा समावेश होता.



प्रदर्शनाचे उद्घाटन करताना श्री. संजय सेठी, सोबत श्री. रविंद्र प्रभुदेसाई, श्री. श्री. वि. करंदीकर, डॉ. विजय बेडेकर, श्री. मा. य. गोखले



दीप प्रज्वलन करताना डॉ. रंगन बॅनर्जी, समवेत प्राचार्य दि. कृ. नायक, खासदार प्रकाश परांजपे, डॉ. विजय बेडेकर, श्री. श्री. वि. करंदीकर

दि. २७ ऑगस्ट रोजी प्रत्यक्ष परिषद थोरले बाजीराव पेशवे सभागृहात सुरु झाली. खासदार प्रकाश परांजपे यांनी परिषदेचे उद्घाटन करताना एकूणच उर्जा प्रश्नाच्या व्यापकते बद्दल माहिती दिली. तसेच शासन व नोकरशाही, तंत्रज्ञ यांच्या धोरणांच्या अंमलबजावणीतील भूमिकांबाबतही त्यांनी विचार व्यक्त केले. या प्रसंगी स्मरणिकेच्या सीडी चे त्यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले.

### बीजभाषण

उद्‌घाटन सत्रात बीजभाषण आय. आय. टी. च्या उर्जा पध्दती विभागाचे प्रा. डॉ. रंगन बॅनर्जी यांनी केले. आपल्या अभ्यासपूर्ण भाषणात एल. सी. डी. च्या साहाय्याने त्यांनी उर्जेसंबंधातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील सद्यःस्थितीचे विश्लेषण सादर केले यामुळे पर्यायी उर्जास्रोत या क्षेत्रातील कामाची गरज स्पष्ट झाली.

उद्‌घाटन सत्राचा समारोप विद्याप्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष व समारंभाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांच्या समारोपपर भाषणाने झाला. त्यांनी आपल्या भाषणात समाजाला भेडसावणाऱ्या या समस्येमुळे सामाजिक जागृती निर्माण करण्यातील गांभीर्य स्पष्ट केले.




समारोप समारंभात डावीकडून प्राचार्य नायक, डॉ. विजय बेडेकर, जिल्हाधिकारी श्री. जंगे, श्री.श्री. वि. करंदीकर

### परिषदेतील विविध सत्रे सत्र पहिले - पवन उर्जा

या सत्राचे अध्यक्ष म्हणून एम्.इ.जी.ए., पुणे चे व्यवस्थापक श्री. एस्. आर्. चौधरी यांनी काम पाहिले. यातील सहभागी चर्चक पुढील प्रमाणे होते.

१) सौ. व्ही. ए. जोशी व सौ. एन. व्ही. वडेर (पवन उर्जा निर्मितीच्या योजना)

२) श्री. मंगेश तिळवे (एनकाने इंडिया) (पवन उर्जेचे व्यापारीकरण व आर्थिक बाजू)

३) श्री. पी. रविंद्रनाथ (संचालक, युनिट्रॉन, एनर्जी सिस्टीमस्) (पवन आणि पवन-सौर संकरण पध्दती)

४) श्री. एस्. सी. पाटील / श्री. पिसे (मेडा) (मेडा च्या एइएस शी संबंधित धोरणातील भूमिकेची केस स्टडी)

५) श्री. व्ही. डब्ल्यू. बागूल, पुणे (केस स्टडी)

परिषदेच्या या सत्रावर अध्यक्षीय भाष्य करताना श्री. चौधरी म्हणाले, "पवन उर्जा संबंधातील सर्व शासकीय धोरणे सामान्यांना माहीत नसतात. या विषयी शिक्षण दिले जाणे आवश्यक आहे" तसेच त्यांनी पवन उर्जा तंत्रज्ञानातील प्रगतीचा वेग वाढण्याची गरज ही स्पष्ट केली.

### सत्र दुसरे - सौर उर्जा

या सत्राचे अध्यक्ष उर्जा क्षेत्रातील नामवंत सल्लागार डॉ. नेतांत माटे हे होते. सत्रात पुढील चर्चकांचा सहभाग होता.

१) श्री. जी. व्ही. गोटमारे, नागपूर (सौर उर्जा वापरून जल उष्ण करण्याच्या पद्धतीचे किफायतशीर मार्ग)

२) श्री. अमित चव्हे, टाटा, बीपी, सोलर इंडिया लि. (फोटोव्होल्टॅइक सेल चे औद्योगिक उपयोजना)

३) सौ. राधा नटराजन, जोशी बेडेकर महाविद्यालय, ठाणे (पवन व सौर उर्जा तौलनिक अभ्यासाची सद्यःस्थिती)

४) श्री. एस. जी. मिटकरी / श्री. एस्. एम्. करी. पार्श्वनाथ अभियांत्रिकी महाविद्यालय (सौर उर्जा वापरून बचत करता येणाऱ्या स्थितींचे सांख्यिकी तपशील)

५) श्री. संतोष भाटे - ठाकूर तंत्रनिकेतन (फोटोव्होल्टॅइक सेल मूलभूत माहिती व कार्य)

डॉ. नेतांत माटे यांनी अध्यक्षीय भाषण करताना या विषयात आवश्यक असलेल्या संशोधन व तांत्रिक प्रगतीची गरज याबद्दल तपशील दिले.

**दि. २८ ऑगस्ट २००५.**

**सत्र तिसरे : जैविक वस्तुमान व जैव वायु**

पुण्याच्या अॅप्रोपिएट रूरल टेक्नॉलॉजी या संस्थेचे अध्यक्ष डॉ. ए. डी. कर्वे यांच्या अध्येक्षतेत हे सत्र संपन्न झाले. डॉ. कर्वे या क्षेत्रातील महत्त्वाचे नाव असून शिवाजी विद्यापीठाचे पी.एच.डी. चे मार्गदर्शक ४ आहेत. या सत्रातील वक्ते पुढीलप्रमाणे

१) श्री. डी. आर. कुलकर्णी. के. जे. सोमैय्या तंत्रनिकेतन (बायोमिथेन पासून आर्थिकदृष्ट्या स्वस्त उर्जा मिळविणास लागणाऱ्या कल्पक रिॲक्टरची कार्यपद्धती)

२) सौ. अरूणा आपटे- पितांबरी कार्डिनल प्रॉडक्टस (जैव डिझेल - भविष्यातील इंधन, पर्यावरणासाठी उपयुक्तता व निर्मिती प्रक्रियांचा तपशील)

३) श्री. अनिल दाते - अपारंपरिक कोल्डवेल तंत्रज्ञानचे कार्यकारी अधिकारी (जैविक वस्तुमान - व्यापारीकरण व आर्थिक बाजू )

डॉ. ए. डी. कर्वे आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले "चूल प्रकल्पाची माहिती इंग्लड मधील शास्त्रज्ञांना दिली तेव्हा त्यांनीही माहितीचे महत्त्व मान्य केले." आपल्या भाषणात त्यांनी जैव वस्तुमानापासून मिळणारे मिथेन, जैविक, डिझेल च्या मर्यादा या मुद्यांचीही चर्चा केली.

**सत्र चौथे - कचऱ्यातून उर्जा**

न्यूक्लियर अॅग्रीकल्चरल ॲन्ड बायोटेक चे वैज्ञानिक अधिकारी डॉ. एस्. पी. काळे यांचा अध्यक्षतेखाली हे सत्र झाले. यातील सहभागी अभ्यासक असे

१) श्री. श्याम राजाळे (ब्रीकेटींग चे तांत्रिक तपशील)

२) डॉ. प्रियदर्शिनी कर्वे - के. एन. अभियांत्रिकी महाविदयालय, पुणे (कृषि उद्योगातील कचऱ्याच्या पुर्नवापर करून उर्जास्रोताचा विकास करण्यातील तांत्रिक व आर्थिक शक्यता)

३) श्री. बी. जे. ब्रिटो (जैव वायुचे मिथेनायझेशन केस स्टडी)

डॉ. एस. पी. काळे अध्यक्षीय समारोप करताना म्हणाले, "नैसर्गिक संशोधनाचा दुरूपयोग आपण करतो यांतून समस्या निर्माण झाल्या आहेत."

**पाचवे सत्र - इतर उर्जा स्रोत**

योजना फ्युएल सर्व्हिसेस चे मालक डॉ. एम्. जी. घारपूरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या सत्रात सादर झालेले निबंध व ते सादर करणारे तज्ञ पुढीलप्रमाणे होते.

१) श्री. डी. आर्. कुलकर्णी व श्री. ए. एस्. वायाळ - के. जे. सोमैय्या पॉलिटेक्निक (लहरी उर्जा स्रोत - पुनर्वापर करता येणारा स्रोत)

२) सौ. उषा राघवन व प्राचार्य दि. कृ. नायक - वि. प्र. सं. चे तंत्र निकेतन (भविष्यातील उर्जा वाहक - जलवायु)

३) श्री. आदित्य मुळे व मनीष - वि. प्र. मं. च्या तंत्रनिकेतनाचे विद्यार्थी (पुनर्वापर शक्य असणारे उर्जास्रोत)

४) श्री. एस्. एन्. जवळकर व श्री. आर्. बी. शर्मा - के. जे. सोमैय्या तंत्रनिकेतन (ज्वलनशील घट - स्वच्छ उर्जेचा प्रभावी पर्याय)

५) श्री. पी. पी. चौधरी - शासकीय तंत्रनिकेतन, पेण (उर्जा व्यवस्थापन - उर्जा स्रोत)

डॉ. घारपुरे यांनी इतर पर्यायी स्रोतांची माहिती देऊन त्यांचा विकास देण्याची गरज स्पष्ट केली.

**समारोप सत्र**

परिषदेचा समारोप ठाणे जिल्हाधिकारी श्री. नंदकुमार जंत्रे यांच्या प्रमुख उपस्थितित संपन्न झाला. परिषदेतील एक प्रतिनिधी व वक्ते श्री. ए. वाय्. वायाळ आणि प्रदर्शनातील सहभागी श्री. खंडागळे यांनी परिषद व प्रदर्शनाबाबत आपले अनुभव मांडले. परिषदेच्या निमंत्रक सौ. अनाहस अलियास यांनी परिषदेची तयारी करताना आलेल्या विविध अनुभवांविषयी सांगितले. परिषदेच्या प्रमुख संयोजिका सौ. एन्. व्ही. वडेर यांनी परिषदेतील सत्रांविषयी माहिती दिली. तंत्रनिकेतनाचे प्राचार्य दि. कृ. नायक यांनी परिषदेतील ठराव वाचून दाखवले.

प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना श्री. नंदकुमार जंत्रे यांनी सामाजिक दृष्ट्या महत्त्वाच्या अशा तांत्रिक विषयावर विचार मंथनाची संधी उपलब्ध करुन दिली याबद्दल विद्याप्रसारक मंडळ व तंत्रनिकेतनाच्या कार्याची प्रशंसा केली. समारंभाचे अध्यक्ष व विद्याप्रसारकमंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी हा शेवट नसून ही एका नव्या चळवळीची सुरुवात असल्याचे सांगून सामाजिक दृष्ट्या महत्त्वाच्या असणाऱ्या या तांत्रिक विषया संदर्भात विद्याप्रसारक मंडळ यापुढेही कार्यरत रहाणार असल्याचे सांगितले.

**प्राचार्य नायक यांनी परिषदेसमोर मांडलेले ठराव**

१) महानगरपालिका व इतर संस्थांनी उर्जासंवर्धन व जागृकता निर्माण करण्यास हाती घेतलेल्या कार्यक्रमात तंत्रनिकेतन सहभागी होईल.

२) उर्जा व्यवस्थापनातील प्रगत पदविका सुरू करण्याची प्रक्रिया चालू केली जाईल. सदर पदविकेला महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ व अपारंपरिक उर्जा स्रोतपर मंत्रालयाची मान्यता मिळविण्याचा प्रयत्न करते.

३) ग्रामीण क्षेत्रातील तरुण शेतकऱ्यांना अपारंपरिक उर्जा स्त्रोत मंत्रालयाची मान्यता असणारे इंटरप्रुनरशिप प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले जातील. तसेच अभियांत्रिकी पदविका व पदवीधरांसाठी व्यवसाय इंटरप्रुनरशिप विकास कार्यक्रम सुटीच्या कालावधीत घेतले जातील.

४) उर्जा केंद्रे व उर्जा उद्यानांचा विकास करून अपारंपरिक उर्जा पध्दतीतील संशोधनास आवश्यक साधने पुरविली जातील. त्यासाठी या मंत्रालयाकडून व महानगर पालिकेकडून अर्थ साहाय्यासाठी अर्ज केला जाईल.

सदर राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यासाठी डॉ. विजय बेडेकर व विद्याप्रसारक मंडळाचे सर्व मान्यवर सदस्य तसेच प्राचार्य नायक सर यांच्या मार्गदर्शनाखाली तंत्रनिकेनातील सर्व शिक्षक शिक्षकेतर सहकारी, विद्यार्थी वर्षभर कार्यरत होते. परिषद यशस्वी करण्यास या सर्वांचाच मोठा वाटा आहे.

राष्ट्रीय स्तरावरील या परिषदेस प्रसिध्दी माध्यमांनीही मोठ्या प्रमाणात प्रसिध्दी देऊन सहकार्य केले. सहभागी प्रतिनिधींमध्ये अनेक नामवंत संस्थांमधील प्राध्यापक, अभ्यासक, शास्त्रज्ञ, कार्यकर्ते यांच्याबरोबर महाविद्यालयीन व शालेय विद्यार्थी यांचा समावेश होता.

विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनाने आता यापुढील राष्ट्रीय परिषदेच्या तयारीस सुरूवात केली असून तिचा विषय 'जिओ इन्फरमेटिक्स' हा आहे असे प्राचार्य नायक यांनी सांगितले.

वृत्तांत लेखन - प्रा. मोहन पाठक

•••.

## दिशाला

**लेखन सहाय्य करू इच्छिणारांना विनंती-**

आंतरराष्ट्रीय पदार्थ विज्ञान वर्ष असल्याने या विषयावर अच्युतराव पटवर्धनांचे वर्ष जन्म शताब्दी वर्ष असल्याने त्यांच्या कार्य तत्त्वज्ञानावर व केशवसुत स्मृतिशताब्दी वर्ष असल्याने केशवसुतांच्या तत्त्वज्ञानावर लेख दिल्यास त्यांचा विचार केला जाईल!

## माहिती करून घ्या !

ठाणे महाविद्यालय परिसर असा उल्लेख करण्याऐवजी ठाणा कॉलेज, बेडेकर कॉलेज असा उल्लेख करणारांसाठी -

महाविद्यालय परिसरात विद्या प्रसारक मंडळ या मातृसंस्थेच्या पुढील संस्था आहेत. त्यांची पूर्ण नावे मुद्दाम देत आहे. केवळ ठाणा कॉलेज म्हणण्यापेक्षा महाविद्यालयाचे नेमके नाव व मराठीत उच्चारले तर ....

१) बांदोडकर कॉलेज- बाळकृष्ण नाईक बांदोडकर विज्ञान महाविद्यालय.

२) जोशी कॉलेज - केशव गणेश जोशी कला महाविद्यालय

३) बेडेकर कॉलेज - नारायण गोविंद बेडेकर वाणिज्य महाविद्यालय

४) लॉ कॉलेज - ठाणे महानगरपालिका विधी महाविद्यालय

५) व्हीपीएम् पॉलिटेक्निक - विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन महाविद्यालय

महाविद्यालय परिसराभोवती उद्यान आहे. हे उद्यान अजून विकसित होत आहे. या उद्यानाला 'ज्ञानमार्ग' हे नाव आहे. या उद्यानात छोटे कार्यक्रम (२५-३० जणांचे) सहज होऊ शकतात. कवी संमेलन, साहित्यिक चर्चा, कथाकथन इ. कार्यक्रमांना सोयीच्या ठराव्यात अशा काही जागा मुद्दाम बनविल्या आहेत.

ज्यांना यात रस आहे त्यांनी आमच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.

- संपादक

# परिसर वार्ता

## सौ. ए. के. जोशी इंग्लिश मिडीयम स्कूल ठाणे

१. इ. ९ वी तील विद्यार्थी सोहम कर्णिक याने U-17 ठाणे जिल्हा बुध्दीबळ निवड स्पर्धेत विभागून द्वितीय क्रमांक मिळवला तसेच ठाणे जिल्हाचे प्रादेशिक स्तरावर प्रतिनिधित्व करण्यासाठी त्याची निवड झाली.

२. अपूर्वा उदय गायकवाड - जिल्हा स्तरावर अनेक बक्षिसे. नाशिक येथे झालेल्या आंतरशालेय जलतरण स्पर्धेत खालील बक्षीसे

८०० मी. - फ्री स्टाईल - कांस्य पदक

४०० मी. - फ्री स्टाईल - रजत पदक

२०० मी. - बॅक स्ट्रोक - रजत पदक

३. विश्व हिंदू परिषदेने घेतलेल्या स्पर्धेत आमच्या विद्यार्थ्यांना खालील पारितोषिके मिळाली

i) संस्कृत श्लोक स्पर्धा -

a) गंधार वेडेकर - प्रथम क्रमांक

b) मधुरा जोशी - द्वितीय क्रमांक

c) पुष्कर ओक - उत्तेजनार्थ

d) कांचन लोवलेकर - प्रथम क्रमांक

e) ऋचा ठकार - द्वितीय क्रमांक

f) मिताली शेट्टी - उत्तेजनार्थ

g) अभिषेक कानडे - उत्तेजनार्थ

ii) संपूर्ण वंदेमातरम् - समूह गायन स्पर्धा - प्रथम क्रमांक

४. विद्या प्रसारक मंडळाने आयोजित केलेल्या जानकीबाई गोखले गीता पठण स्पर्धेत कु. मनीष काळे इ. ८ वी ब याने (१७ वा अध्याय) प्रथम क्रमांक मिळविला.

५. रोटरी क्लब ठाणे ने आयोजित केलेल्या उपशास्त्रीय गायन स्पर्धेत मधुरा जोशी हिला तृतीय क्रमांक मिळाला.

६. आशिष मुळे इ. ९ वी याला ठाणे जिल्हा आंतरशालेय कराटे स्पर्धेत सुवर्ण पदक मिळाले. आणि नाशिक येथे होणाऱ्या स्पर्धेसाठी त्याची निवड झाली.

७. 'नॅशनल चिल्ड्रन सायन्स कॉंग्रेस २००५' ने आयोजित केलेल्या प्रकल्प स्पर्धेत आमच्या विद्यार्थ्यांनी तालुका स्तरावर तयार केलेल्या तीन प्रकल्पांची जिल्हास्तरावर निवड झाली.

| प्रकल्पाचे नाव | अ) हायड्रोफोनिक्स | ब) स्वयंपाक घरातील पाण्याचा पुर्नवापर | क) ठाण्यातील जलतरणतलावांचा अभ्यास |
|---|---|---|---|
| सहभागी विद्यार्थी | प्राची जोशी<br>निकीता शहा<br>तनुज नावर<br>साहिल काणेकर<br>हर्षल गाडे | कृणाल चौधरी<br>अश्लेषा पोटदुखे<br>सिद्दार्थ नायर<br>अनिल ओक<br>ऐश्वर्या ओक | सुवर्धन अहीरराव<br>पुष्कर वेलणकर<br>तृपाली प्रसादे<br>गौरी आपटे<br>मुस्तफा करी |

## बांदोडकर मधील संख्याशास्त्र कार्यशाळा

'संख्याशास्त्र' एकविसाव्या शतकातील आधुनिक शास्त्र पण एकविसाव्या शतकात सर्व शाखांचा प्राणवायू बनू पहात असलेले शास्त्र ! प्रयोगशाळेत केलेल्या प्रयोगांचे संख्याशास्त्रीय विश्लेषण आजकाल जीवशास्त्र, रसायनशास्त्र, पदार्थविज्ञान अशा मूलभूत शाखांच्या अभ्यासासाठीच नव्हे तर मानसशास्त्र, जीवभौतिकशास्त्र, अर्थशास्त्र, माहिती तंत्रज्ञान, वैद्यकशास्त्र या शास्त्रांसाठीही पूरक ठरत आहे. गणितापेक्षा जास्त उपयुक्त ठरलेल्या या शास्त्राचे सुलभ स्वरूप याला कारणीभूत असले तरी याची विविध तंत्रे वापरताना या शास्त्राची सखोल माहिती नसल्यास याचा यथातथाच किंवा चुकीचा वापर होतो. म्हणूनच प्राणिशास्त्र व वनस्पती शास्त्राच्या अभ्यासक्रमात मुंबई विद्यापीठाने या विषयांचा ही समावेश केला. परंतु संख्याशास्त्राची तंत्रे शिकवताना या विषयातील शिक्षकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे दिसून आले. तसेच या विषयाचे ज्ञान संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना स्वयंपूर्ण बनवेल असा ही एक उद्देश होता. यातूनच बा. ना. बांदोडकर महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी 'संख्याभिज्ञांसाठी संख्याशास्त्र' (अर्थात Statistics for non-statistician) ह्या कार्यशाळा आयोजनाचा प्रस्ताव मांडला व त्यांच्या अध्यक्षतेखाली एक नियोजन समिती नेमून दि. २७ ते दि. २९ सप्टेंबर २००५ या ३ दिवसांच्या कालावधीत अशा कार्यशाळेचे आयोजन करण्याचे ठरले.

नियोजन समितीत संख्याशास्त्राच्या प्राध्यापकांबरोबर वनस्पतिशास्त्र विभागातील डॉ. सौ. मेधा मुळगावकर (प्रपाठक व विभागप्रमुख) डॉ. नागेश टेकाळे (प्रपाठक) आणि प्राणिशास्त्र विभागातील डॉ. सौ. नंदिनी पाटील (विभागप्रमुख व प्रपाठक) डॉ. रघुनंदन आठल्ये यांचाही समावेश करण्यात आला. संख्याशास्त्र विभागातील प्रा. अशोक पाटील (विभागप्रमुख) प्रा. सौ. मिलन घोलव, प्रा. सौ. सुधा फाटक व प्रा. सौ. कल्पना फळ २० वर्षाहून अधिक काळ, हा विषय शिकवणारे कुशल प्राध्यापक आहेत. म्हणूनच प्राचार्य, सौ. माधुरी पेजावर व या चौघांबरोबरच संख्याशास्त्र विभागातील नवनियुक्त प्रा. सौ. मोहिनी कुलकर्णी ह्यांही मदतीने तयारीस लागल्या. या प्राध्यापकांनीच ही धुरा उचलावी असे सुचविले व बाहेरचे वक्ते न आणता कार्यशाळा पार पाडण्याचे ठरले.

मुंबई विद्यापीठाच्या कक्षेत येणाऱ्या महाविद्यालयांमध्ये निमंत्रण पाठवले गेले . परंतु गेल्या काही दिवसातील अनिश्चित हवामानामुळे याची जाहिरात सर्वदूर करता आली नाही. तरीदेखील विविध महाविद्यालयातील २३ विद्यार्थी व ४० प्राध्यापकांनी या कार्यशाळेला प्रतिसाद दिला. यात व्यवस्थापन पदार्थविज्ञान, अभियांत्रिकी गणित, जीवभौतीक अशा विषयाच्या शिक्षकांनीही भाग घेतला, ही नमूद करण्यासारखी गोष्ट आहे. ठाणे मुंबई परिसराखेरीज रत्नागिरी कुडाळ उरण या महाविद्यालयातील प्राध्यापकांचाही या कार्यशाळेत सहभाग होता.

दि. २ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता कार्यशाळेचे उद्‌घाटन विद्याप्रसारक मंडळाच्या थोरले बाजीराव पेशवे



२७/९/२००५ सकाळी सभागृहात क्कार्यशाळेचे उद्‌घाटन करताना डॉ. एस्. आर.तिवारी (प्राचार्य महर्षी दयानंद महाविद्यालय, परेल)

सभागृहात महर्षि दयानंद महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. एल्. आर. तिवारी यांच्या हस्ते झाले. डॉ. तिवारी हे "जीवसंख्याशास्त्र" (Biostatistics) हा विषय तृतीयवर्ष प्राणिशास्त्र या अभ्यासक्रमात समाविष्ट करणाऱ्यांमध्ये अग्रेसर असलेल्या धुरिणींपैकी एक ! त्यामुळे त्यांना या समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन करण्यासाठी पाचारण करण्यात आले होते. वि. प्र. मंडळाचे अध्यक्ष श्री. करंदीकर यांनी उद्‌घाटन कार्यक्रमास उपस्थित राहून आपल्या शुभेच्छा दिल्या या कार्यक्रमानंतर लगेचच कार्यशाळेला प्रत्यक्ष सुरुवात झाली.

तीन दिवसात सकाळी ९ ते ४.३० असे व्याख्यानांचे आयोजन केले होते. Graphtical presentation measurer of central tendency, Measurer of dispersion, correlation, vegrasion, probability, normal distribution, parametric and non-parametric tests of hypothen's अशा विविध विषयांवर सविस्तर माहिती दिली गेली. दृकश्राव्य तंत्र वापरून तसेच उत्तम टिपणे देवून वरील प्राध्यापकांनी उत्कृष्ट मार्गदर्शन केले व विषय सोप्या पध्दतीने कसा शिकवता येईल याचे प्रात्यक्षिक केले. त्यांचे पूर्व नियोजन वादातीत होतेच, परंतु त्यांचे संघकौशल्य ही एक अतिशय प्रशंसनीय बाब दिसून आली. दि. २९ सप्टेंबर रोजी सर्व विषयांवरील प्रात्यक्षिक (अर्थात Practicals) यात अगदी Calculator कसा वापरावा व त्याचा पुरेपूर उपयोग कसा करावा हेही शिकवले गेले. त्या सत्राला अतिशय उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला व भविष्यात या सत्रावर जास्त भर द्यावा असे सुचविण्यात आले. त्यानंतर मुक्त चर्चासत्र होते. त्याचे सूत्रसंचालन डॉ. रघुनंदन आठल्ये यांनी केले. विषय शिकवताना प्रत्यक्ष येणाऱ्या अडचणींचा त्यांनी उहापोह केला व त्यावरचे उपाय सुचविले.

दि. २९ रोजीचे अखेरचे सत्र प्रशस्तिपत्रके देण्यासाठी आयोजले होते. हा समारंभ याच सभागृहात दुपारी ४.३० वाजता पार पडला. भारतीय विज्ञान संशोधन संस्थेतील वरिष्ठ संशोधक डॉ. शशीकुमार मेनन या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते. स्वतःला संख्याशास्त्र अनभिज्ञ असल्यास कोणकोणत्या अडचणींना तोंड द्यावे लागले ते विशद करून संख्याशास्त्राशी दोस्ती केल्यानंतर त्यांचे संशोधन किती सुकर झाले ते स्पष्ट केले. विविध क्षेत्रात अध्यापन व संशोधन करणाऱ्या सर्वच श्रोत्यांना डॉ. मेनन यांचे विचार अतिशय मोलाचे मार्गदर्शन करणारे ठरले.

कार्यशाळेच्या समारोप समारंभास जोशी बेडेकर वाणिज्य महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सिंग, उपप्राचार्या प्रा. शास्त्री, बा. ना. बांदोडकर महाविद्यालयाचे सर्व विभागप्रमुख प्राध्यापक, ग्रंथपाल प्रा. मोहन पाठक, ॲटव्हान्स स्टडी सेंटरचे डॉ. गो. वि. कुलकर्णी उपस्थित होते.

कोणतेही प्रकल्प हे सर्वांच्या सहकार्यानेच यशस्वीरित्या पार पडू शकतात. या कार्यशाळेसाठी देखील गणित, पदार्थविज्ञान, प्राणिशास्त्र, वनस्पतिशास्त्र या विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अतिशय एकजुटीने काम केले. विशेष उल्लेख करावासा वाटतो तो तृतीयवर्ष संख्याशास्त्राच्या विद्यार्थ्यांचा ! कु. अमृता महाजन, कु. अपर्णा जोशी, कु. सुप्रिया लोखंडे, कु. कविता चासकर, कु. प्रतीक्षा फुलसुंदर, कु. श्वेता दीक्षित कु. अंजली पाटील, कृष्णा पार्टे व गौरव पाटील या विद्यार्थ्यांनी स्वयंसेवक म्हणून मोठा भार उचलला.

सहभाग्यांनी अभिप्रायादाखल कौतुकाचे शब्द काढून यानंतर रिफ्रेशर कोर्स ची मागणी केली यातच कार्यक्रमाचे यश सांगता येईल !

शब्दांकन : प्रा. सौ. कल्पना फळ
संख्याशास्त्र विभाग
बा. ना. बांदोडकर महाविद्यालय

## संगणक आणि मराठी चर्चासत्र

## दुसरी कार्यशाळा : दि. २५/९/२००५

### अहवाल

'संगणक आणि मराठी' या विषयावर विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी बेडेकर महाविद्यालयामध्ये एका राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन दि. २८ जानेवारी २००६ रोजी करण्यात आले आहे.

आजपर्यंत बऱ्याचशा दुर्लक्षेत असलेल्या या विषयाकडे गांभिर्याने पाहण्याचा दृष्टिकोन ठेऊन मुख्य चर्चासत्रा आधी दोन कार्यशाळा घेऊन त्यामध्ये संबंधित विषयाशी निगडित विविध तज्ञांची मते जाणून घेणे व मार्गदर्शन करणे हा हेतू होता. यापैकी पहिली कार्यशाळा रविवार दि. ८ मे २००५ रोजी तर दुसरी कार्यशाळा दि. २५ सप्टेंबर २००५ रोजी यशस्वीरित्या पार पडल्या.

दि. २५ सप्टेंबर २००५ रोजी झालेल्या कार्यशाळेसाठी १२५ प्रतिनिधी उपस्थिती होते.

कार्यक्रमाच्या आरंभी जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. शकुंतला सिंग यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले व कार्यशाळेसाठी उपस्थित तज्ञ मार्गदर्शक श्री. र. कृ. जोशी, श्री. निनाद प्रधान, श्री. अभिजित काळे, श्री. धायगुडे, श्री. एम. एस. श्रीधर, कौस्तुभ काळे वि. प्र. म. चे अध्यक्ष श्री. श्री. वि. करंदीकर, कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत केले.

डॉ. विजय बेडेकर यांनी आपल्या प्रास्ताविकामध्ये विद्या प्रसारक मंडळाची या प्रकारच्या शैक्षणिक उपक्रमांच्या संदर्भातील भूमिका स्पष्ट करून संगणक आणि मराठी या आजपर्यंत दुर्लक्षित विषयाकडे सर्वांनी गांभीर्याने पहावे व आपले योगदान द्यावे असे प्रतिपादन केले डॉ. बेडेकरांनी आपल्या भाषणामध्ये संगणक आणि मराठी च्या संदर्भात १५ व्या शतकात मुद्रण कलेचा शोध लागल्यापासून आजपर्यंतच्या विविध टप्प्यांचा ऐतिहासिक आढावा घेतला व पाश्चात्यांनीच मराठी व इतर भारतीय भाषांच्या बाबतीत व्याकरणापासून - मुद्रण व आता संगणकीकरणापर्यंत भरीव कामगिरी केली असल्याचा उल्लेख केला. टंकलेखन व मुद्रणामध्ये भारतीयांच्या कामगीरीचाही उल्लेख केला. त्यामध्ये देवनागरीच्या संदर्भात निर्णयसागर प्रेसचा आवर्जून उल्लेख केला.

संगणकीकरण व आंतरजाल (Internet) या मध्ये देवनागरी संकेतस्थळे त्याचप्रमाणे सध्या व्यापारी तत्त्वावर विकसित केलेल्या फॉन्टस् च्या बंधनातून युनिकोड (Unicode) स्वरूपातील सर्व ऑपरेटिंग सिस्टिम वर काम करता येईल अशा स्वरुपाच्या देवनागरी, संगणकीकरण या वरती काम करण्याची आवश्यकता डॉ. बेडेकरांनी विषद केली. संगणक व आंतरजालमध्ये उपलब्ध सर्व माहितीची उपलब्धता व संप्रेषण देवनागरीत करता यायला हवे व त्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन करण्यात आले. कार्यशाळेतील दुसरे भाषण अनंत कार्पोरेशनचे श्री. कौस्तुभ काळे यांनी दिले. त्यांचा विषय होता ओपन सोर्स (Open Source). आपल्या भाषणात त्यांनी ओपन सोर्स संकल्पना विषद करून सांगितली व ती आत्मसात का करायला हवी याविषयी मत मांडले. संगणक क्रांतीचा मागील दशकातील आढावा त्यांनी घेतला. आपल्या दृक श्राव्य सादरीकरणाद्वारे त्यांनी Linux व Linux चे उपयोग, वापरण्यातील व्यावहार्यता यावर लक्ष केंद्रित केले. Linux Open Source आपल्याला कोणालाही स्वामित्व हक्क फी देण्याची गरज नसते व त्यामध्ये आपण आपल्या गरजेप्रमाणे बदलही करू शकतो.

**श्री. धायगुडे :**

कार्यशाळेतील तिसरे मार्गदर्शनपर भाषण श्री. धायगुडे यांचे झाले. आपल्या भाषणात त्यांनी देवनागरी लिपी मधुन फक्त संप्रेषण अपेक्षित न करता मराठी प्रोग्रामिंग करता यायला हवे व त्यासाठी प्रयत्न कसे करता येतील यावर भाष्य व अपेक्षा व्यक्त केल्या. त्याचप्रमाणे Computational Linguictics विकसित करणे व वि. प्र. मं. ने पुढाकार घेऊन त्या संबंधी अभ्यासक्रम सुरू करण्याची गरज व्यक्त केली.

**श्री. एम. एस. श्रीधर :**

मराठी साठी आकृती फॉन्ट विकसित करण्याचा अनुभव असलेल्या श्रीधर यांनी देखील Unicode Fonts ची गरज व्यक्त करून या संबंधीचा आढावा आपल्या भाषणात घेतला. त्याचप्रमाणे विविध फॉन्टस् बनवताना काय अडचणी येऊ शकतात व त्या त्यावरील उपाय या संदर्भात चर्चा केली.

**श्री. निनाद प्रधान :**

श्री. प्रधान यांनी मराठी भाषेतील संगणक प्रणाली व ॲप्लिकेशन सॉफ्टवेअर यावर चर्चा केली. त्याचप्रमाणे विन्डोज x लिनक्स व विन्डोज आणि लिनक्स यातील महत्वाच्या मुद्याचा परामर्ष घेतला. विन्डोजवर चालणारी हजारो सॉफ्टवेअर आहेत परंतु लिनक्स मध्ये मात्र तितकी प्रगत झालेली नाही याची कारणमीमांसा करतांना व्यापारी तत्वावर तयार होणाऱ्या संगणक सॉफ्टवेअर या जास्त ग्राहक ज्या ऑपरेटींग सिस्टिम चे आहेत त्यावर सॉफ्टवेअर विकसित केले जातात. परंतु आता परिस्थिती बदलत आहे व लिनक्सवर चालणारी सॉफ्टवेअर विकसित होत आहेत. आपल्या भाषणात त्यांनी मराठीत संकेतस्थळां विषयी देखील माहीती दिली.

**श्री. अभिजित काळे**

e-book-गणपुस्तक म्हणजे काय ? वैशिष्ट्य व गणपुस्तकाचे विविध फायदे श्री. काळे यांनी आपल्या दृकश्राव्य, भाषणाने दाखवून दिले. त्याचप्रमाणे वि. प्र. म. ने केलेल्या चिपळूणकर निबंध मालेच्या गणपुस्तकाविषयी माहिती दिली.

**श्री. आर. के. जोशी.**

मराठी मुद्राक्षरे प्रवास आणि विकास या विषयावरील रंजक व अभ्यासपूर्ण भाषण श्री. जोशी यांनी केले. मुद्राक्षरउपयोग, मुद्रानिर्मितीतील विविध टप्पे, प्रकार, मांडणी या वर चर्चा केली.

**शब्दांकन : प्रा. नारायण बारसे.**

**१ ऑगस्ट २००५ रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या वर्धापन दिनी प्राचार्य स. वा. गोखले यांनी सादर केलेला अहवाल**

**जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे.**

- शैक्षणिक वर्ष २००४-२००५ मध्ये जोशी-बेडेकर महाविद्यालयातर्फे विविध शैक्षणिक व इतर उपक्रम राबविण्यात आले. त्यामध्ये प्रामुख्याने खालील उपक्रमांचा उल्लेख करता येईल.
- भूगोल विभागा तर्फे प्रथम वाणिज्य (F. Y. B.COM) या वर्गाच्या पर्यावरणशास्त्र अभ्यासक्रमाची एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेला मुंबई विद्यापीठाला संलग्न असलेल्या महाविद्यालयाचे १०० प्रतिनिधी उपस्थित होते.
- दि. १२ व १३ ऑगस्ट २००४ रोजी महाविद्यालय

ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागाच्या वतीने संदर्भ ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते या प्रदर्शनाचा लाभ शिक्षक व विद्यार्थ्यांबरोबर ठाणे शहरातील नागरिकांनी ही घेतला.

- ❖ महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र, भूगोल व राज्यशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने ''जलव्यवस्थापन'' या विषयावरील राष्ट्रीय परीषदेचे आयोजन दि. २१ जानेवारी २००५ रोजी करण्यात आले होते. मॅगेसेस पुरस्कार विजेते व आंतरराष्ट्रीय ख्यातीचे जलव्यवस्थापन तज्ञ डॉ. राजेंद्र सिंग, माजी केंद्रीय मंत्री व खासदार मा. सुरेश प्रभू, खासदार प्रकाश परांजपे, डॉ. देसरडा, डॉ. खातू यांची अभ्यासपूर्ण भाषणे या परिषदे मध्ये झाली. आमच्या महाविद्यालयातील इतिहास विभागाचे प्रा. सुभाष शिंदे व प्रा. राधा नटराजन यांनी देखील आपला शोध निबंध या परिषदेत सादर केला.

- ❖ अर्थशास्त्र विभागातील प्रा. रुपाली वाळुंजकर देशपांडे यांनी पोर्तुगाल मधील लेस्बन येथे अर्थशास्त्रावरील आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये शोध निबंधाचे वाचन केले.

- ❖ २३ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट २००४ या कालावधीमध्ये कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक संवर्गातील पदांसाठी मान्यता देण्यासाठीच्या कार्यशाळेचे आयोजन महाविद्यालयामध्ये केले होते.

- ❖ ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभागाच्या विद्यमाने "ICT For Library Management" या कार्यशाळेचे आयोजन १६ ते २० मे २००५ या कालावधीमध्ये केले होते. या कार्यशाळेसाठी ३५ प्रतिनिधी उपस्थित होते. ग्रंथालय माहितीशास्त्र क्षेत्रातील नामवंत तज्ञांनी मार्गदर्शन केले. यामध्ये विद्यार्थी, शालेय ग्रंथपाल व महाविद्यालय ग्रंथपालांचा समावेश होता. प्रतिनिधींना श्री. श्री. वि. करंदीकर वि. प्र. मं. चे अध्यक्ष यांच्या हस्ते उद्घाटन झालेल्या या कार्यशाळेचा समारोप करण्यासाठी मा. श्री. मा. य. गोखले कोषाध्यक्ष विद्या प्रसारक मंडळ, ठाणे व ठाणे भारत सहकारी बँकेचे अध्यक्ष उपस्थित होते.

- ❖ महाविद्यालयाचा वार्षिकोत्सव नवरंग दरवर्षी प्रमाणे उत्साहात साजरा करण्यात आला. या वर्षीच्या नवरंगचे प्रामुख्याने गाजवणारे वैशिष्ट्य म्हणजे या मध्ये झालेले सर्व कार्यक्रम व स्पर्धांचे व्यवस्थापन विद्यार्थ्यांनीच केले होते. वार्षिक पारितोषिक समारंभाचे आयोजन व व्यवस्थापन देखील विद्यार्थ्यांनीच पार पाडले.

- ❖ महाविद्यालयाचे निकाल रिझल्ट

| | |
|---|---|
| XIIth ARTS | 75.64 % |
| XIIth COMMERCE | 93.85 % |
| T.Y.B.A. | 87.90 % |
| T.Y.B.COM | 63.99 % |
| BMS | 82.67 % |
| B.LIS | 81.00 % |
| M.COM I | 44.12 % |
| M. COM II | 91.67 % |

(Philosophy) तत्वज्ञान विभागप्रमुख डॉ. शकुंतला सिंग या नवी दिल्ली येथे झालेल्या 'अरविंदो आणि मानवाचा भविष्यकाळ' या विषयावरील चर्चासत्रात विशेष निमंत्रित म्हणून उपस्थित होत्या.

- ❖ महाविद्यालयाच्या "युवाशिल्प" या वार्षिक अंकाला कोकण विभागीय महाविद्यालयीन वार्षिक अंक स्पर्धेचा प्रथम क्रमांकाचा राजा राजवाडे स्मृती पुरस्कार लागोपाठ दुसऱ्या वर्षी मिळाला.

- ❖ सुधीर फडके स्मृती समूहगान स्पर्धेत आमच्या महाविद्यालयाला प्रथम बक्षिस मिळाले.

- ❖ महाविद्यालयातील बॅडमिंटन संघाने मुंबई विद्यापिठात

सुवर्ण पदक मिळवले व प्रविण उपाध्याय हा खेळाडू वैयक्तिक अजिंक्य पदासाठी सुवर्णपदकाचा मानकरी ठरला.

- खुल्या मुष्टी युध्द (BOXING) स्पर्धेत अतुल रेडकर यास सुवर्ण पदक मिळाले. त्याच प्रमाणे कु. संचिता गावकर हिस ज्युडो (JUDO) स्पर्धेत सुवर्ण पदक मिळाले.
- कु. हिरल मेहेता हिने मुंबई विद्यापिठाच्या योग स्पर्धेमध्ये प्रथम पारितोषिक प्राप्त केले.
- कु. प्राजक्ता राऊत हिने आंतरविद्यापिठ सांस्कृतिक स्पर्धेत मुंबई विद्यापिठाचे प्रतिनिधीत्व केले.
- प्रा. दिगंबर भिडे यांनी राष्ट्रीय स्तरावरील केंद्रीय विद्यालयाच्या अर्थशास्त्राच्या शिक्षकांना मार्गदर्शन करण्यासाठी निमंत्रित केले गेले.
- महाविद्यालयाचे ग्रंथपाल व ग्रंथालय आणि माहितीशास्त्र अभ्यासक्रम संयोजक प्रा. नारायण बारसे यांनी ठाणे पोलिस आयुक्त व पोलीस अधिक्षक (ठाणे ग्रामीण) यांच्या कार्यालयातील लिपिक वर्गीय कर्मचारी व अधिकारी यांच्यासाठी आयोजित केलेल्या प्रशिक्षण कार्यशाळेमध्ये "OFFICE PROCEDURE MANUAL" आणि कार्यालयीन कामामध्ये संगणकाचा वापर या विषयावर तीन दिवस मार्गदर्शन केले.
- प्रा. प्रकाश शिंदे, भूगोल विभाग प्रमुख यांची एन. के. टी. महाविद्यालयाच्या स्थानिक सल्लागार समितीच्या सदस्यपदी निवड.
- १४ सप्टेंबर ०५ रोजी 'बाल चित्रपट' मार्फत पर्यावरण विषयक विद्यार्थ्यांसाठी उद्बोधनपूर्ण चित्रपट सादर झाला. त्या चित्रपटाविषयी माहितीपूर्ण निवेदन श्री. किरण गडकरी यांनी सादर केले. त्यांत प्राणी जीवन, सजीवांची अनुकुलन क्षमता, आणि प्राणिजीवनाची अन्नसाखळी या विषयी उपयुक्त माहिती दिली.
- २४ सप्टेंबर २००५ रोजी न्यु गर्ल्स स्कूल, ठाणे येथे सर्व शिक्षण मोहिमेअंतर्गत गटसंमेलन झाले. यांत आपल्या शाळेतील एकूण १० शिक्षक उपस्थित होते. सौ. संगीता शिंगाडे, सौ. सायली माने, सौ. मिनाक्षी कुमावत, सौ. वंदना अडसुळे, सौ. उज्वला धोत्रे, कु. कल्पना वापुले, श्री. जीवन जाधव, श्री. भानुदास गावित, श्री. दीपक धोंडे व श्री. प्रकाश पांचाळ या शिक्षकांचा समावेश होता. तसेच दुसरे गट संमेलन १ ऑक्टोबर ०५ रोजी झाले. त्याही गटसम्मेलनाला वरील शिक्षक उपस्थित होते.
- २ ऑक्टो. ०५ रोजी 'श्रीमती जानकीबाई गोखले' गीता पठण स्पर्धा विद्याप्रसारक मंडळातर्फे घेण्यात आली.

  आपल्या शाळेतील कु. कल्पेश कटके, कु. तन्मय पाटील, कु. मोनिका रंगदाळ व ________ (९ अ) या ४ विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली. पाठांतरासाठी त्यांना गीतेचा १७ वा अध्याय देण्यात आला होता.

  परीक्षक म्हणून सौ. मीरा लिमये, श्री. दीपक धोंडे, श्री. जीवन जाधव, श्री. प्रकाश पांचाळ व श्री. करमसींग सोनावणे यांनी काम पाहिले तर सौ. सुचिता शेलार, कु. आशालता लोखंडे, सौ. संगीता शिंगाडे, कु. कल्पना वापुले यांनी मदतनीस म्हणून काम केले.
- २ ऑक्टोबर ०५ रोजी P. E. Society's New English School, मीठबंदर रोड, ठाणे, येथे वन्यजीव समाहानिमित्त पर्यावरण दक्षता मंच तर्फे एक

निसर्ग मेळावा आयोजित करण्यात आला होता. त्यांत वेगवेगळ्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

| | | |
|---|---|---|
| **चित्रकला स्पर्धा** | जीवन चौघुले | (तृतीय क्रमांक) |
| **झाडे ओळखा** | अजित साळुंखे | (द्वितीय क्रमांक) |
| | निखिल वारघडे | (तृतीय क्रमांक) |
| **भित्ती पत्रिका** | पाण्याची शेती | (तृतीय क्रमांक) |

या कार्यक्रमाला सौ. मंजिरी दांडेकर व सौ. साधना कारंडे यांच्या बरोबर २० विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

❖ दि. ६/१०/०५ रोजी शारदोत्सवा निमित्त ठिपक्यांच्या रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. अतिशय उत्साहाने या स्पर्धेसाठी प्रतिसाद मिळाला. जवळ जवळ ५० ते ५५ विद्यार्थी सहभागी झाले होते. इयत्ता वार पुढील क्रमांक काढले.

| | | |
|---|---|---|
| ५ वी - | १) साठे प्रियांका | (५ ब) |
| | २) मोरे प्रज्ञा | (६ इ) |
| ६ वी - | १) स्नेहा दाभाडे | (६ इ) |
| | २) अंकिता चिद्रवार | (६ इ) |
| ७ वी - | १) सकपाळ प्रणाली | (७ ड) |
| | २) फणसे पूजा | (७ ड) |
| ८ वी - | १) मोनाली धरणकर | (८ अ) |
| | २) श्रध्दा यादव | (८ अ) |
| ९ वी - | १) शिंदे दिपाली | (९ ड) |
| | २) पवार आकाश | (९ इ) |
| १० वी - | १) पाटील श्वेता | (१० क) |
| | २) यादव स्मिता | (१० ड) |

❖ १० ऑगस्ट ०५ रोजी अँकर कंपनी तर्फे भरतकाम स्पर्धा घेण्यात आली. ६ वी ते ८ वी मधील जवळ जवळ ६५ विद्यार्थी स्पर्धेत सहभागी झाले होते.

| | | |
|---|---|---|
| इ. ८ वी ब | स्वाती घोंग | प्रथम क्रमांक |
| इ. ७ वी अ | तृप्ती पालनकर | द्वितीय क्रमांक |
| इ. ६ वी ब | नम्रता शर्मा | तृतीय क्रमांक |

उत्तेजनार्थ दर्शना मोरे (८ ड) वैदेही दरप (७ ब) अदिती खोपडे (८ ब) मनीष जाधव (६ ब) प्रियांका लोखंडे (७ अ)

❖ १६ सप्टेंबर ते २६ सप्टेंबर या कालावधीत 'धर्मवीर क्रीडा संकुल, सिध्दार्थनगर, ठाणे येथे आपल्या शाळेतील खो-खो, कबड्डी आणि क्रिकेटसाठी १४ व्या वर्षाखालील व १७ वर्षाखालील विद्यार्थी, तालूका स्तरावर पावसाळी क्रीडा स्पर्धेसाठी सहभागी झाले.

१४ वर्षाखालील मुले व मुली खो-खो संघ (द्वितीय क्रमांक)

१४ वर्षाखालील मुली कबड्डी संघ (द्वितीय क्रमांक)

१७ वर्षाखालील मुले कबड्डी व खो-खो संघ (द्वितीय क्रमांक)

१७ वर्षाखालील मुली कबड्डी (प्रथम क्रमांक)

जिल्हास्तरीय खेळण्यासाठी १७ वर्षाखालील मुली कबड्डी संघ वाडा येथे गेले होते.

जिल्हास्तरावर हा संघ द्वितीय क्रमांकावर पोहोचला. संघास श्री. गवई, श्री. गदरी, श्री. पांचाळ व श्री. जाधव या शिक्षकांनी मार्गदर्शन केले.

❖ सौ. मंजिरी दांडेकर यांची महाराष्ट्र राज्य माध्यमिक, उच्च माध्यमिक मंडळ येथे कार्यानुभव हस्तपुस्तिका लेखनासाठी निवड करण्यात आली.

शब्दांकन **आशा जोशी**

•••